रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक १९४
www.ramprahar.com
# राम प्रहर
गुरुवार, ३० जानेवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

'जमीन नसलेल्या बेघरांना घरकुलाचा लाभ प्राधान्याने'/२
दूषित पाणी, शिळ्या अन्नामुळे 'जीबीएस'चा धोका/३
रायगडचा हापूस खातोय मुंबईच्या बाजारात भाव/७

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता मिळविणे होणार अधिक सोपे

**मुंबई :** मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून वैद्यकीय सहाय्यता मिळणेकरिता आजारांचे पुनर्विलोकन करणे, आजारांकरिता देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्याची रक्कम नव्याने निश्चित करणे व रुग्णालय संलग्नीकरणासाठी निकष ठरविण्याकरिता शिफारशी करणेबाबत समिती गठित करण्यात आली आहे. याबाबत शासननिर्णय काढण्यात आला असल्याची माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी दिली. या समितीमध्ये संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय (मुंबई) हे अध्यक्ष असतील. मुख्यमंत्री कार्यालयातील मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे कक्ष अधिकारी हे सदस्य सचिव म्हणून काम पाहतील. मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाने वैद्यकीय उपचाराबाबत वेळोवेळी विविध विषयांच्या अनुषंगाने विचारणा केल्यास ही समिती त्या विषयांबाबत शिफारस सादर करेल.

# मराठा आरक्षणाची उच्च न्यायालयात पुन्हा सुनावणी

## संपूर्ण प्रकरणाबाबत याचिकाकर्त्यांची विनंती मुख्य न्यायमूर्तींकडून मान्य

**मुंबई : प्रतिनिधी**

मराठा आरक्षणासंदर्भात एक मोठी बातमी समोर आली आहे. मराठा आरक्षणाबाबत मुंबई उच्च न्यायालयाने मोठा निर्णय दिला असून आता या प्रकरणाची सुनावणी पुन्हा नव्याने सुरू होणार असल्याची माहिती पुढे आली आहे.



सरकारी नोकऱ्या आणि शिक्षणात मराठा आरक्षण कायद्याला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सुरूवातीपासून पुन्हा सुनावणी होणार आहे. याचिकाकर्त्यांच्या वतीने नवनियुक्त मुख्य न्यायमूर्तींना विनंती केली होती. तसेच नवीन विशेष पूर्णपीठ स्थापन करण्याचेही हायकोर्टाला साकडे घातले होते. दरम्यान, या विनंतीला न्यायमूर्तींकडून मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली पूर्णपीठ नव्याने सुनावणी घेण्यास तयार झाले आहे. सोबतच याचिकाकर्त्यांना याबाबत रजिस्ट्रारकडे नव्याने अर्ज करण्याचे ही कोर्टाने निर्देश दिले आहेत.

पुढे आलेल्या माहितीनुसार, मराठा आरक्षणासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने पुन्हा नव्याने सुनावणी होणार असल्याचे निर्देश दिले असले तरी, कुठेतरी मराठा आरक्षणाची सुनावणीला आता आणखी वेळ लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. कारण याआधी ज्या मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली कोर्ट या प्रकारणी सुनावणी घेत असत ती सुनावणी जवळपास पूर्ण होण्याच्या मार्गावर होती. जवळजवळ ६० टक्के ही सुनावणी पूर्ण झाल्याच्या मार्गावर होती. यात याचिका करतेच आहे युक्तिवाद झाला होता तर सरकारी वकिलांचा युक्तिवाद सुरू होता.

दरम्यान, पुन्हा एकदा याची कागर त्यांना संधी देऊन हे प्रकरण न्यायप्रविष्ठ होणार होते, मात्र मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश यांची मुंबई उच्च न्यायालयात बदली झाल्यामुळे ही सुनावणी पुन्हा नव्याने नव्या न्यायपिठापुढे होणार असल्याची माहिती पुढे आली आहे. त्यामुळे हा कालावधी कुठेतरी ग्राह्य धरला जाईल. मुळे दोन्ही बाजूच्या सरकारी वकील आणि याचिकाकर्त्यांना नव्याने आपले म्हणणे मांडावे लागेल. त्यामुळे मराठा आरक्षणासंदर्भात निर्णय येण्यास आणखी काही महिने लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## महाकुंभमेळ्यातील मृतांच्या वारसांना ५० लाखांची मदत

**प्रयागराज : वृत्तसंस्था**

प्रयागराज येथील महाकुंभमेळ्यात संगम तीरावर चेंगराचेंगरी होऊन ३० जणांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेतील मृतांच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी बुधवारी (दि.२९) ५० लाखांची मदत जाहीर केली. तसेच या घटनेच्या न्यायालयीन चौकशीचे आदेशही दिले आहेत.

चेंगराचेंगरीत ८० हून अधिक जण जखमी झाले असून या जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर मुख्यमंत्री



योगी आदित्यनाथ यांनी या घटनेची न्यायालयीन चौकशी होणार असल्याची माहिती पत्रकारांना दिली.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याशी संपर्क साधून परिस्थितीचा आढावा घेतला आहे.


## जीबीएस आजाराचे लोण पसरतेय!

### सतर्क राहण्याचे आवाहन

**पुणे : प्रतिनिधी**

सध्या राज्यभरात जीबीएस आजाराचे थैमान सुरू असून पुणे, नांदेड, सोलापूरनंतर आता या आजाराचे लोण छत्रपती संभाजीनगरपर्यंतदेखील पोहचले आहे. छत्रपती संभाजी नगरच्या घाटी रुग्णालयात जीबी सिंड्रोमचे तीन रुग्ण आढळले असून त्यामध्ये दोन महिला आणि एका १० वर्षीय मुलीचा समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. नागरिकांनी घाबरून जाऊन नये पण सतर्क रहावे, असे आवाहन डॉक्टरांतर्फे करण्यात आले आहे.

राज्यात गुइनेल बॅरे सिंड्रोमच्या (जीबीएस) रुग्णसंख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. याची दखल केंद्र सरकारने घेतली आहे. महाराष्ट्रातील आरोग्याची ही समस्या हाताळण्यासाठी केंद्र सरकारने उच्चस्तरीय समिती नियुक्त केली आहे. राज्यात गुइलेन बॅरे सिंड्रोमच्या (जीबीएस) रुग्णांची संख्या १०१ वर पोहोचली असून, त्यातील १६



रुग्ण व्हेंटिलेटरवर आहेत. पुण्यानंतर आता पश्चिम बंगालमध्येही जीबीएसने थैमान घातले आहे. जीबीएसमुळे १० आणि १७ वर्षीय अशा दोन मुलांचा मृत्यू झाला असल्याचे वृत्त द इंडियन एक्सप्रेसने दिले आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, १० वर्षीय मुलाला कोलकाता येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. उपचार सुरू असताना रविवारी त्याचा मृत्यू झाला.

## सौदी अरेबियामध्ये भीषण अपघातात नऊ भारतीयांचा मृत्यू

**सौदी : वृत्तसंस्था**

पश्चिम सौदी अरेबियातील जिझानजवळ झालेल्या भीषण अपघातात नऊ भारतीय नागरिकांचा मृत्यू झाला आहे, अशी माहिती जेद्दाह येथील भारतीय वाणिज्य दूतावासाने दिली आहे. तसेच अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांच्या संपर्कात असल्याचेही स्पष्ट केले आहे. परराष्ट्र मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी या दुर्घटनेबाबत तीव्र दुःख व्यक्त केले आहे.

या अपघाताबद्दल आणि जीवितहानीबद्दल जाणून घेतल्याबद्दल दुःख झाले. जेद्दाहमधील वाणिज्य दूतावासाशी संपर्क झाला आहे. येथील वाणिज्य दुतावास दुर्घटनाग्रस्तांच्या कुटुंबांच्या संपर्कात आहेत. दुःखद परिस्थितीत पूर्ण मदत करत आहेत, असे त्यांनी आपल्या एक्स पोस्टमध्ये म्हटले आहे.

## केजरीवालांच्या वक्तव्याने देशातील जनतेचा अपमान -पंतप्रधान मोदी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी केलेल्या आरोपावरून संपूर्ण देशातील जनतेचा अपमान झाला आहे, त्यामुळे दिल्लीची जनता त्यांना येत्या निवडणुकीत चांगलाच धडा शिकवेल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे.

अरविंद केजरीवाल यांनी आरोप केला होता की, हरियाणात भाजपचे लोक यमुना नदीच्या पाण्यात विष मिसळत आहेत आणि तेच पाणी दिल्लीत पाठवले जात आहे. केजरीवाल यांच्या या वक्तव्यानंतर भाजपचे दिल्लीतले व



देश पातळीवरील नेते आप प्रमुखांवर तुटून पडले. दरम्यान, पंतप्रधान मोदी यांनी केजरीवालांच्या या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, अरविंद केजरीवालांनी केवळ हरियाणातील नव्हे तर संपूर्ण देशातील जनतेचा अपमान केला आहे. एखाद्याची चूकभूल माफ करणे ही आपली संस्कृती आहे. परंतु, कोणी जाणून बुजून चुका करत असेल, देशालाच अपमानित करत असेल तर देश त्याला कधीच माफ करत नाही. हा आपल्या संस्कृतीचा अपमान आहे. केजरीवालांना अशी भाषा शोभत नाही. दिल्लीची जनता त्यांना येत्या निवडणुकीत चांगलाच धडा शिकवेल. त्यांचा अंहकार यमुनेच्या पाण्यात बुडवेल. हे 'आप'वाले नाहीत हे 'आपदा'वाले आहेत. यांना जनतेची कामं करायची नाहीत. या लोकांनी भारताच्या शूर सैनिकांनी केलेल्या सर्जिकल स्ट्राइकचे पुरावे मागितले होते. आपल्या वीरांना पुरावे मागितले.

## निवडक

### सैफच्या हल्लेखोराला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

**मुंबई :** अभिनेता सैफ अली खान हल्ला प्रकरणातील आरोपीला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. आरोपी मोहम्मद शहजाद याला १९ जानेवारीला अटक करण्यात आली होती, तेव्हापासून तो पोलीस कोठडीमध्ये होता. आता त्याला न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. बुधवारी (दि.२९) वांद्रे येथील न्यायालयात हजर करण्यात आले होते. या वेळी ही शिक्षा सुनावण्यात आली.

### पानसरे हत्या प्रकरण; सहा आरोपींना जामीन

**मुंबई :** कॉ. गोविंद पानसरे यांच्या हत्येप्रकरणी गेल्या सहा वर्षांपासून अटकेत असलेल्या सहा आरोपींना उच्च न्यायालयाने बुधवारी (दि.२९) जामीन मंजूर केला. आरोपी बऱ्याच काळापासून अटकेत असल्याच्या कारणास्तव त्यांना जामीन मंजूर केला जात असल्याचे न्यायालयाने उपरोक्त निर्णय देताना स्पष्ट केले. न्यायमूर्ती अनिल किलोर यांच्या एकलपीठाने जामीन मंजूर केला, तर डॉ. वीरेंद्र तावडे याची जामीन याचिका नंतर दाखल झाल्याने न्यायालय त्यावर आता स्वतंत्र सुनावणी घेणार आहे.

## महाडच्या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचा मार्ग मोकळा; जागेबाबत शासनाचे आदेश

**महाड, पोलादपूर : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील केंबूर्ली येथे दोनशे खाटांचे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभारण्यासाठी शासनाने मंजुरी दिली होती, मात्र जागा डोंगरावर असल्याने हॉस्पिटल शासकीय जागेवीना प्रलंबित होते. बुधवारी (दि.२९) आमदार प्रवीण दरेकर यांच्या पुढाकाराने हा निर्णय बदलण्याच्या सुचना महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत.



महाड तालुक्यातील केंबूर्ली येथे दोनशे खाटांचे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभारण्यासाठी शासनाने मंजुरी दिली होती. त्यानुसार शासकीय जमीन हॉस्पिटलला देण्यासाठी शासन निर्णयही जारी करण्यात आला, मात्र ज्या जमिनीवर हे रुग्णालय उभारायचे होते त्या जमिनीऐवजी डोंगरावरील जमीन हॉस्पिटलसाठी देण्याचा निर्णय झाला. यावर पोलादपूरचे सुपुत्र आमदार प्रवीण दरेकर यांनी आक्षेप घेत हा निर्णय रद्द करून नवीन निर्णय जारी करावा अशी मागणी केली होती. त्यानुसार मंत्रालयात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दालनात बैठक झाली. बैठकीत सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलसाठी जी शासकीय जमीन ठरली होती त्याचा नवीन शासन निर्णय काढावा, अशा सूचना महसूल मंत्र्यांनी संबंधित विभागाला दिल्या. महसूल मंत्र्यांच्या या निर्णयाने आमदार दरेकर यांच्या प्रयत्नांना यश आले आहे.

५ सप्टेंबर २०२३ रोजी केंबुर्ली येथे सुपर स्पेशालिटी रुग्णालय उभारण्यास शासनाने मंजुरी दिली व २८ नोव्हेंबरला शासन निर्णय जारी केला. स. नं. ४८/२ ही शासकीय जमीन रुग्णालयासाठी देण्याचा शासन निर्णय काढण्यात आला. यावर दरेकर यांनी आक्षेप घेत महाड उपविभागीय अधिकारी व रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी जमीन रुग्णालयाला देण्याचा प्रस्ताव कोकण विभागीय आयुक्तांना पाठवला होता. महसूल मंत्र्यांकडे बैठकीची मागणी केली. शासकीय जमीन देण्याबाबतचा नवीन शासन निर्णय काढावा, असा सूचना संबंधित विभागाला दिल्या.

या बैठकीला आमदार दरेकर, महाड विधानसभा प्रमुख बिपीन म्हामुणकर आदी उपस्थित होते.

### रुग्णांच्या सोयी सुविधांसाठी प्रयत्न

मुंबई-गोवा महामार्गांवर महाड हे मध्यवर्ती ठिकाण आहे. त्यामुळे महाड उपजिल्हा रुग्णालय व ट्रामा केअर सेंटर या रुग्णालयांना महत्त्व आहे. महाड तालुक्यातील ग्रामीण भागातील लोकांना उपचारासाठी या रुग्णालयांत यावे लागते, परंतु येथे सोयी-सुविधांची वाणवा असल्याने येथील रुग्णांना मुंबई व अन्य ठिकाणी न्यावे लागते. याची दखल घेत आमदार दरेकर यांनी महाडला २०० खाटांचे सुपर स्पेशालिटी रुग्णालय व्हावे, अशी मागणी अधिवेशनादरम्यान सभागृहात केली होती. तत्कालीन मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे पत्र व्यवहारही केला होता.

## मुंबईत लवकरच बाईक टॅक्सी

**मुंबई : प्रतिनिधी**

दिल्लीच्या धर्तीवर महायुती सरकारने रॅपिडोसारखी बाईकची टॅक्सी सेवा मुंबईत सुरू करणार आहे. पुढील दोन महिन्यांत बाईक टॅक्सी रस्तावर दिसायला लागणार आहे, याबद्दल पहिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी तशी माहिती दिली.

मुंबईतील वाहतूक कोंडीतून सुटका करण्यासाठी आणि वेळेवर ऑफिसवर पोहचण्यासाठी चाकरमान्यांसाठी आता रॅपिडो टॅक्सी सेवा मुंबईत सुरू होणार आहे. मुंबईत बाईक टॅक्सी बाबत परिवहन विभागाने असा निर्णय घेतला आहे. मुंबईत पुढच्या दोन महिन्यांत रॅपिडो सारख्या बाइक सर्विस मुंबईत सुरू होणार आहे. बाईक टॅक्सी सुरू करतांना महिला सुरक्षेची विशेष काळजी घेतली जाणार आहे. बाईक चालकाला मागे बसलेल्या महिला प्रवाशांसाठी बाईकच्या मधोमध पार्टीशन लावणे बंधनकारक असणार आहे. ओला, उबेर या खासगी कार सेवेप्रमाणेच मुंबईत बाईक टॅक्सीला परवानगी देण्यात येणार आहे, अशी माहिती प्रताप सरनाईक यांनी दिली.

केंद्र सरकारने बाईक टॅक्सी हे धोरण दोन वर्षांपूर्वीच आणले. त्यानुसार गोवा, कर्नाटक, राजस्थान, उत्तर प्रदेश यासह इतर राज्यांमध्येही बाईक टॅक्सीला परवानगी आहे.

### सरकारचा ग्रीन सिग्नल



### महिलांनासुद्धा रोजगार

*राज्य सरकारने मुंबई आणि पुण्यात रॅपिडो बाइक टॅक्सी सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या बाइक टॅक्सीमुळे तरुणांना रोजगार मिळेल, असा उद्देश सरकारचा आहे. यातून महिलांना सुद्धा रोजगार मिळेल.*

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन

### डॉ. अरुणकुमार भगत यांच्या वाढदिवसानिमित्त कामोठे येथे उपक्रम





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांच्या वाढदिवसानिमित्त कामोठे येथील गणेश मंदिरात मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमाला उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, कामोठे शहराध्यक्ष रवी जोशी, उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, माजी नगरसेवक विकास घरत, तसेच हर्षवर्धन पाटील, दामोदर चव्हाण, तेजस जाधव, भाऊ भगत, आशा भगत, हेमलता गोवारी, कुसुम म्हात्रे, विद्या तामखेडे, हरजिंदरकौर सिंग, आदित्य भगत आदी उपस्थित होते.

दरम्यान, आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह उपस्थितांनी डॉ.अरुणकुमार भगत यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

या मोफत आरोग्य तपासणी शिबिरात नेत्र तपासणी, मूत्रविकार, मेंदू व मज्जा संस्था विकास, त्वचारोग, कृत्रिम अवयव, कान, घसा, तपासणी अशा विविध आजारांवर निदान करण्यात आले.

## विमान अपघातात २० जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दक्षिण सुदानमध्ये एका विमानाला अपघात झाला आहे. या विमानात प्रवासी आणि क्रू मेंबर्ससह २१ लोक होते. या अपघातात २० जणांचा मृत्यू झाला असून, या मृतांमध्ये दोन चीनी आणि एका भारतीय नागरिकाचा समावेश आहे.

अपघात झाला तेव्हा विमान युनिटी ऑइलफील्ड विमानतळावरून राजधानी जुबाकडे उड्डाण करत होते. युनिटी राज्याचे माहिती मंत्री गटवेच बिपल यांनी अपघाताच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे.


या विमानात ग्रेटर पायोनियर ऑपरेटिंग कंपनीशी संबंधित तेल क्षेत्रातील कर्मचारी होते.


### राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा


## महाराष्ट्राच्या पदकांचा चौकार

**हल्दवानी : वृत्तसंस्था**

उत्तराखंडात सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राने बुधवारी (दि.२९) पदकांचा चौकार लगावला. २ रौप्य व २ कास्य पदके जिंकून महाराष्ट्राने दिवस गाजविला. मिहीर आम्ब्रे यांनी रौप्य पदक पटकाविले. मुलींच्या रिले शर्यतीत महाराष्ट्राला रौप्य पदक तर आदिती हेगडे हिला एक कांस्यपदकाची कमाई केली. सोलापूरच्या ओम अवस्थी याने दहा मीटर प्लॅटफॉर्म डायव्हिंग प्रकारात कांस्यपदकाची कमाई केली.







हल्दवानीतील इंदिरा गांधी स्टेडियममध्ये जलतरण तलावावर पुण्याच्या मिहिर आम्रेने पुरूषांच्या १०० मीटर बटरफ्लाय प्रकारात रौप्य पदकाचा करिश्मा घडविला. नाशिकच्या अदिती हेगडे हिने महिलांच्या २०० मीटर फ्री स्टाईल प्रकारात कांस्यपदकाची कमाई केली. मिहीर आम्ब्रे या महाराष्ट्राच्याच खेळाडूने १०० मीटर्स बटरफ्लाय क्रीडा प्रकारात रुपेरी यश संपादन केले. मुलींच्या चार बाय शंभर मीटर फ्रीस्टाइल रिले शर्यतीत महाराष्ट्राला रौप्य पदक मिळाले.

महाराष्ट्राच्या आदिती हेगडे हिने २०० मीटर्स क्रीडा प्रकारात कांस्यपदकाची कमाई केली व दिल्लीची भाव्या सचदेव (दोन मिनिटे ८.६८ सेकंद) यांनी अनुक्रमे सुवर्ण व रौप्य पदकाचा मान मिळविला. ओम अवस्थीने अप्रतिम कौशल्य दाखवीत दहा मीटर प्लॅटफॉर्म डायव्हिंग प्रकारात कांस्यपदकाची कमाई केली.

# जमीन नसलेल्या बेघरांना घरकुलाचा लाभ प्राधान्याने - ग्रामविकास मंत्री




**मुंबई : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सर्व घरकुल लाभार्थ्यांना आपल्या हक्काचे घर मिळवून देण्याच्या दृष्टीने यंत्रणेने काम करावे, यामध्ये जमीन नसलेल्या बेघरांना घरकुल योजनेंतर्गत प्राधान्याने लाभ देण्याच्या सूचना ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांनी दिल्या. मंत्रालयात ग्रामविकास व पंचायत राज विभागाशी संबंधित कोकण विभागाची आढावा बैठक झाली. बैठकीस ग्रामविकास व पंचायत राज राज्यमंत्री योगेश कदम, ग्राम विकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, कोकण विभागीय आयुक्त राजेश देशमुख, यांच्यासह कोकण विभागातील जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प संचालक, संबंधित अधिकारी उपस्थित होते.

**घरकुल निर्मितीचे काम उत्तम दर्जाचे आणि गतीने करावे**

ग्रामविकास मंत्री श्री. गोरे म्हणाले की, देशातील प्रत्येकाला हक्काचे घर मिळावे यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आग्रही आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून राज्यातील प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुल निर्मितीचे काम उत्तम दर्जाचे आणि गतीने होण्यावर विशेष लक्ष देण्यात येत आहे. हे लक्षात घेऊन शासनाच्या शंभर दिवस कार्यक्रमांतर्गत ग्रामविकास विभागाच्या विविध योजनांची अधिक पारदर्शकतेने आणि गतिमानतेने अमंलबजावणी करावी.

राज्याला वीस लाख घरकुल निर्मितीचे उद्दिष्ट मिळाले आहे. सर्व पात्र लाभार्थ्यांच्या घरकुलास मान्यता देऊन घरकुल बांधकाम तत्परतेने सुरू करावे. ज्या लाभार्थ्यांकडे जमीन नाही, बांधायला जागा नाही असे लाभार्थी प्रथम प्राधान्याने घ्यावे. तसेच जागा असलेल्या मात्र घर नसलेल्या लाभार्थीची स्वतंत्र यादी करावी, असे सूचित करुन श्री.गोरे यांनी सांगितले की, घरकुल मंजूरीची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर गावागावांत ग्राम सभांमध्ये याबाबत माहिती द्यावी.

घरकुल लाभार्थ्यांच्या नावांची यादी ग्रामपंचायत कार्यालयाच्या परिसरात लावावी. जेणेकरून गावातील सर्वांना घरकूल लाभार्थ्यांची माहिती होईल. त्याचप्रमाणे घरकुलाचे हप्ते सर्व लाभार्थ्यापर्यंत वेळेत पोहचवावेत. सर्वेक्षण करताना प्रत्येक पात्र लाभार्थ्याला योजनेचा लाभ होईल या दृष्टीने सर्वेक्षणाचे काम करावे. कोकण पट्ट्यात गावातील गावठाण जमिनी घरकूल योजनेसाठी वापराव्यात. त्याचप्रमाणे पंडित दीनदयाळ उपाध्याय योजनेंतर्गतही घरकुलांचा लाभ लाभार्थ्यांना द्यावा. योजनेचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी काटेकोर नियोजन करावे.

ग्रामविकास विभागाच्या ग्रामीण जीवन्नोन्नती अभियानांतर्गत स्वयं सहायता समूहाचे मोठे जाळे तयार झालेले आहे. त्यात ग्राम संघ, प्रभाग संघ, शेतकरी उत्पादक कंपनी यामध्ये सहभागी सर्व गटांची सक्रियता वाढविण्यावर यंत्रणानी अधिक लक्ष द्यावे. हे सर्व गट सक्रिय होण्यासाठी समन्वयपूर्वक कार्यपद्धती स्वीकारुन कामांची गती वाढवावी. क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी प्रभाग संघाना भेटी द्याव्यात. विभागांतर्गत विविध योजनांची पारदर्शक आणि लोकाभिमुखपणे अमंलबजावणी करावी, अशा सूचनाही मंत्री श्री.गोरे यांनी यावेळी दिल्या.

ग्रामविकास राज्यमंत्री योगेश कदम यांनी घरकुलाचे हप्ते नियमितपणे लाभार्थ्यांना मिळतील याकडे यंत्रणेने कटाक्षाने लक्ष द्यावे, असे सूचित करुन सांगितले की, कामांची वेळेत आणि दर्जेदार पूर्तता होण्याच्या दृष्टीने यंत्रणांनी प्रत्यक्ष पाहणीवर भर द्यावा. स्थळ पाहणी वेळेत करावी. हप्ता वितरित केल्यावर घरकुलाच्या सुरु केलेल्या कामाची नोंदणी व्यवस्थित ठेवावी. कामाच्या टप्पानिहाय विहित केल्यानुसार लाभार्थ्यांना हप्ते द्यावे. बचतगटांची उत्पादकता वाढवण्यासाठी आणि अधिक संख्यने ते कार्यरत ठेवण्यासाठी संबंधित यंत्रणाप्रमुखांनी त्यांच्या नियमित बैठका घ्याव्यात. ग्रामविकास विभागाच्या लखपती दिदी योजनेसह इतर सर्व योजनांची व्यापक प्रमाणात अंमलबजावणी करून उद्दिष्ट साध्य करण्यासाठी काम करण्याचे निर्देश मंत्री कदम यांनी दिले.

ग्रामीण जीवनोन्नती अभियान, ब वर्ग तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम, प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान यासह ग्रामविकास विभागाच्या विविध योजनांचा सविस्तर आढावा यावेळी घेण्यात आला.

## स्वच्छ सर्वेक्षणमध्ये श्रीवर्धनची उत्तम कामगिरी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**



स्वच्छतेच्या क्षेत्रात श्रीवर्धन नगर परिषदेला २०२३ च्या स्वच्छ सर्वेक्षणात ऐतिहासिक यश मिळालं आहे. नगर परिषदेनं कोकण विभागात १५,००० ते २५,००० लोकसंख्येच्या श्रेणीत प्रथम स्थान मिळवले, महाराष्ट्र राज्यात पाचव्या आणि देशभरातील पश्चिम विभागात २०व्या स्थानावर झेप घेतली आहे. श्रीवर्धन नगर परिषदेला मिळालेलं हे यश, स्वच्छतेच्या बाबतीत या शहराची सर्वोत्तम कामगिरी आहे.

श्रीवर्धन नगर परिषदेनं स्वच्छ सर्वेक्षणात मोठं यश साधलं, मंत्री आदिती तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली, श्रीवर्धन नगर परिषदेला स्वच्छता आणि घनकचरा व्यवस्थापनासाठी आवश्यक असलेली आधुनिक यंत्रसामग्री आणि इन्फ्रास्ट्रक्चर मिळालं. त्याचबरोबर जिल्हाधिकारी योगेश म्हसे यांच्या दूरदृष्टीतून दर महिन्याला स्वच्छता अभियान राबवले गेले, ज्यामुळे नागरिकांमध्ये स्वच्छतेची महत्त्वाची जाणीव निर्माण झाली. मुख्याधिकारी विराज लबडे यांच्या नेतृत्वाखाली आणि नगरपरिषदेमधील सर्व अधिकारी व कर्मचार्यांच्या मेहनतीने स्वच्छतेचा प्रचार आणि जनजागृती प्रभावीपणे केली गेली.

शहरातील कचरा संकलन, नालेसफाई, सार्वजनिक शौचालय स्वच्छता, प्लास्टिक बंदी मोहिमा यांसारख्या कार्यांमध्ये नगरपरिषदेने उच्च दर्जाच्या कार्याची अंमलबजावणी केली आहे. याशिवाय, व्हर्टिकल गार्डन्स, शोभनीय कारंजे, भिंतीवरील चित्रकला, कापडी पिशवी अभियान यामुळे शहराच्या सौंदर्यात महत्त्वपूर्ण बदल झाला आहे. या उपक्रमांमुळे श्रीवर्धनचे रूप नवा रंग घेत आहे आणि शहराच्या वातावरणात स्वच्छतेचा सकारात्मक परिणाम दिसून येत आहे.

श्रीवर्धन नगर परिषदेला १ स्टार कचरा मुक्त शहर म्हणून मानांकन मिळालं आहे. याचबरोबर, हागणदारी मुक्त शहराचा (ODF+) दर्जा कायम ठेवला आहे. यंदा श्रीवर्धनने २०२२ च्या स्वच्छ सर्वेक्षणात १६व्या स्थानावरून थेट पाचव्या स्थानावर झेप घेतली आहे. यामुळे श्रीवर्धन शहराची स्वच्छता आणि इन्फ्रास्ट्रक्चर कामांमध्ये केलेले अढळ बदल दिसून येत आहेत.

मुख्याधिकारी विराज लबडे यांनी स्वच्छता प्रेमी नागरिक आणि राबणारे सफाई कामगारच यशाचे खरे हिरो असल्याचे सांगुन, आगामी स्वच्छ सर्वेक्षण २०२४ मध्ये श्रीवर्धन नगर परिषदेला प्रथम स्थान मिळविण्याचे ध्येय ठरवून, यशस्वी स्वच्छता मोहिमेची गती कायम ठेवण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्नशील राहावे, असं आवाहन केले आहे.

## भाजप व्यापारी सेलच्या कर्जत तालुका अध्यक्षपदी अरविंद कटारिया



**कर्जत :** कर्जत तालुका भारतीय जनता पक्षाच्या व्यापारी सेलचे अध्यक्ष म्हणून नेरळ येथील व्यापारी अरविंद कटारिया यांची नियुक्ती करण्यात आली.

कर्जत तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक वाढविणारे अरविंद कटारिया यांनी काही दिवसांपूर्वी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला होता. राज्यसभा सदस्य खासदार धैर्यशील पाटील यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश करणारे अरविंद कटारिया यांच्यावर कर्जत तालुका व्यापारी सेल ची जबाबदारी देण्यात आली आहे.

माजी आमदार आणि कर्जत विधानसभा प्रभारी सुरेश लाड यांचे हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले.त्यावेळी भारतीय जनता पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी तसेच जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, जिल्हा चिटणीस रमेश मुंढे, कर्जत तालुका अध्यक्ष राजेश भगत, कर्जत तालुका महिला मोर्चा अध्यक्ष नम्रता कांदळगावकर उपस्थित होते.

## पेण कृषी उत्पन्न बाजार समिती सभापतीपदी भाजपचे महादू मानकर

**पेण : प्रतिनिधी**



कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जयप्रभा म्हात्रे यांनी सभापती पदाचा राजिनामा दिल्याने रिक्त झालेल्या सभापतीपदी महादू मानकर यांची बिनविरोध निवड झाली.

पंधरा वर्ष महादू मानकर हे कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक म्हणून काम पाहत असून काही काळ त्यांनी खरेदी विक्री संघाचे संचालक म्हणून देखील त्यांनी काम पाहिले आहे. त्यांच्या या प्रदिर्घ अनुभवाचा फायदा कृषी उत्पन्न बाजार समितीला होईल असे जाणकारांचे मत आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणुक असल्याने सकाळपासूनच भाजप पार्टी कार्यालयात कार्यकर्त्यांची रेलचेल होती. कोण सभापती होईल याबाबत शेवटपर्यंत गुलदस्त्यात ठेवण्यात आले होते. उमेदवारी अर्ज भरण्याच्या ५ मिनीट अगोदरच महादू मानकर यांचे नाव पुढील एक वर्षासाठी खासदार धैर्यशील पाटील यांनी जाहीर केले. तर त्याच्या पुढील एक वर्षासाठी हरिश्चंद्र पाटील हे सभापती असतील असे ही यावेळी जाहीर करण्यात आले.

दोन वाजता सभापती पदाची नियुक्ती जाहीर केल्यानंतर खासदार धैर्यशील पाटील यांनी पुष्पगुच्छ देउन नवनिर्वाचित सभापतीचे अभिनंदन केले. तर मावळते सभापती जयप्रभा यांनी देखील पुष्पगुच्छ देउन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी जि.प.सदस्य प्रभाकर म्हात्रे ,डी. बी. पाटील, प्रफुल्ल म्हात्रे, सदस्य संदेश ठाकूर, काशिनाथ पाटील, सुरेश पाटील, बापू दळवी यांच्यासह मोठ्या प्रमाणात भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

## शिधापत्रिका धारकांनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी, अन्यथा लाभ थांबवला जाईल

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

शिधापत्रिका धारकांना जीवनावश्यक वस्तू सवलतीच्या दरात मिळवून देण्यासाठी सरकार विविध योजना राबवत आहे. परंतु, या योजनांचा योग्य लाभ गरीब आणि गरजू व्यक्तींनाच मिळावा, यासाठी शिधापत्रिकेवरील ई-केवायसी प्रक्रिया अनिवार्य करण्यात आली आहे.

ई-केवायसी न झाल्यास, तुमच्या शिधापत्रिकेवरील लाभ थांबवले जाऊ शकतात. त्यामुळे, शिधापत्रिकाधारकांना लवकरात लवकर ही प्रक्रिया पूर्ण करण्याची आवश्यकता आहे.

यासाठी जवळच्या रेशन दुकानदाराकडे शिधापत्रिका, आधार कार्ड या कागदपत्रांसह जाऊन तुमचा अंगठा पॉस मशीनवर ठेवावा लागेल. मशीनवर अंगठा यशस्वीरित्या स्कॅन झाल्यावर तुमची ओळख सत्यापित होउन तुमची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण होईल.ई-केवायसीची प्रक्रिया पूर्ण केल्यावरच तुम्हाला शिधापत्रिकेवरील लाभ मिळू शकतील.

जर तुम्ही लवकरात लवकर ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली नाही, तर तुमच्या शिधापत्रिकेवरील लाभ थांबवले जाऊ शकतात. त्यामुळे, शिधापत्रिकाधारकांनी वेळेत ही प्रक्रिया पूर्ण करून सरकारी योजनांचा पूर्णपणे लाभ घ्या.

**शिधापत्रिकाधारकांनी लवकरात लवकर ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली पाहिजे, अन्यथा त्यांच्या शिधापत्रिकेवरील लाभ बंद होण्याची शक्यता आहे. ई-केवायसीसाठी रेशनकार्ड आणि आधार कार्ड ही दोन महत्त्वाची कागदपत्रे आवश्यक असून, रेशनधारकांनी जवळच्या रेशन दुकानात जाऊन अंगठा स्कॅन करून ओळख सत्यापित करणे आवश्यक आहे.**

**– महेंद वाकलेकर, तहसिलदार ,श्रीवर्धन**


## मुलीचे फोटो व्हायरल करणारा आरोपी जेरबंद

**पनवेल : वार्ताहर**

उलवे परिसरात राहणार्या २० वर्षीय तरुणाने १४ वर्षीय शाळकरी मुलीला धमकावून जबरदस्तीने तिचे अश्लिल फोटो काढून त्याने सोशल मिडीयावर व्हायरल केल्याचे उघडकीस आले आहे.

आरोपी पिडीत मुलीच्या शाळेजवळ गेला असताना, नागरिकांनी त्याला चोप देऊन पोलिसांच्या स्वाधीन केले. उलवे पोलिसांनी या आरोपीला अटक केली आहे. या घटनेतील १४ वर्षीय पिडीत मुलगी आणि अटक आरोपी वुर्बान असलम शेख (२०) दोघेही उलवे परिसरात राहण्यात असून सदर मुलगी इयत्ता आठवीमध्ये शिक्षण घेत आहे. वुर्बान शेख मागील २ वर्षापासून पिडीत मुलीच्या मागे लागला होता. काही महिन्यापूर्वी त्याने सदर मुलीला आणि तिच्या वडिलांना मारण्याची धमकी देऊन तिच्यासोबत जबरदस्तीने अर्धनग्न अवस्थेत फोटो काढले. या प्रकारानंतर घाबरलेल्या पिडीत मुलीने आरोपीला टाळण्यास सुरुवात केल्यानंतर आरोपीने काही दिवसापूर्वी सदर मुलीचे अश्लिल फोटो इन्स्टाग्राम आणि फेसबुकवर व्हायरल केले. या प्रकाराची माहिती पिडीत मुलीला मिळाली होती. त्यानंतर वुर्बान सदर मुलीच्या शाळेजवळ तिचा पाठलाग करत गेला होता. यावेळी पिडीत मुलीने आरडा-ओरड केल्यानंतर त्याठिकाणी जमलेल्या नागरिकांनी वुर्बानला पकडून त्याला बेदम मारहाण करुन त्याला उलवे पोलिसांच्या स्वाधीन केले.

## लोककला आणि वाद्यसाठी शिष्यवृत्ती योजना जाहीर करणार



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनातर्फे यापुढे लोककला आणि लोक वाद्य साठी नवी शिष्यवृत्ती योजना सांस्कृतिक कार्य मंत्री अँड आशिष शेलार यांची संभाजीनगर मध्ये पत्रकार परिषदेत जाहीर केली

ज्या पद्धतीने शासनाच्या सांस्कृतिक संचनालयातर्फे शास्त्रीय संगीत शिकणाऱ्या १२ विद्यार्थ्यांना महिन्याला ५ हजार रुपये पंडित भिमसेन जोशी शिष्यवृत्ती दिली जातेही शिष्यवृत्ती दोन वर्षे एका विद्यार्थ्यांना मिळते तशाच प्रकारे यापुढे लोककला शिकणाऱ्या १२ आणि लोकवाद्य शिकणाऱ्या १२ अशा चोवीस विद्यार्थ्यांना शासनातर्फे शिष्यवृत्ती देण्यात येईल

प्रत्येकी ५ हजार रुपये प्रमाणे ही शिष्यवृत्ती देण्यात येईल. त्याचे नियम नियमावली लवकरच जाहीर करु, असेही मंत्री अँड आशिष शेलार यांनी जाहीर केले

## झुंझार पोयनाडचे मैदान युवा खेळाडूंसाठी प्रेरणादायी-अनिरुद्ध पाटील




**अलिबाग : प्रतिनिधी**

झुंझार युवक मंडळ पोयनाडचे मैदान हे जिल्ह्यातील युवा खेळाडूंसाठी प्रेरणादायी असून झुंझार तर्फे सातत्याने युवा क्रिकेटपटूंसाठी विविध वयोगटातील क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे,ह्या स्पर्धेच्या माध्यमातून खेळाडूंना मोठे व्यासपीठ,प्रोत्साहन व ओळख मिळून देण्याचे काम झुंझार युवक मंडळाने केले आहे, असे प्रतपदान रायगड जिल्हा क्रिकेट असोसिशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी केले.

झुंझार युवक मंडळ पोयनाड आयोजित व रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने पै. अन्वर बुराण माजी अध्यक्ष झुंझार युवक मंडळ यांच्या स्मरणार्थ चौदा वर्षाखालील मुलांच्या एकदिवसीय ४० षटकांच्या लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहेत . या स्पर्धेचे उद्घाटन मंगळवारी (दि.२८) रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांच्या हस्ते करण्यात आले,यावेळी ते बोलत होते.

झुंझार.युवक मंडळाचे अध्यक्ष अन्वर बुराण यांच्या नेतृत्वाखाली अनेक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.या स्पर्धामधून जिल्ह्यातील अनेक युवा खेळाडूंनी आपल्या आयुष्यातील पहिली लेदर बॉल क्रिकेट मॅच याच झुंझारच्या मैदानावर खेळली आहे,स्पर्धेत खेळलेले बरेच खेळाडू सध्या मुंबई व महाराष्ट्राच्या विविध ज्युनिअर वयोगटाच्या संघात स्थान मिळवताना दिसतात,ह्या स्पर्धेला रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनची अधिकृत मान्यता देताना आपल्या आनंद होत असल्याचे पाटील म्हणाले.

या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील १६ संघानी सहभाग घेतला असून प्रथम २४ सकाळी फेरीचे ४ उपांत्यपूर्व फेरीचे,२ उपांत्य फेरीचे व १ अंतिम सामना असे एकूण ३१ एकदिवसीय ४० षटकांच्या सामन्यांचे आयोजन करण्यात आले आहे.


स्पर्धेचा उद्घाटनीय सामना कोंढाळकर्स क्रिकेट अकॅडमी लोधीवली व सागर कांबळे क्रिकेट अकॅडमी पनवेल या संघांमध्ये झाला.या कार्यक्रमासाठी आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, उपाध्यक्ष राजेश पाटील, झुंझारचे सचिव किशोर तावडे, क्रीडा प्रमुख नंदकिशोर चवरकर , पोयनाड ग्राम पंचायतीचे सदस्य सुनील पाटील,माजी खेळाडू मुराद बुराण,अजय टेमकर,महेंद्र पालव,रिटायर्ड फौजी उदय चवरकर,पंकज चवरकर,अँड.पंकज पंडित,संदीप जोशी,निशांत माळी कोंढाळकर्स क्रिकेट अकॅडमीचे प्रशिक्षक समीर सुर्वे पनवेल क्रिकेट स्पोर्ट्स अकॅडमीचे प्रशिक्षक सागर कांबळे,सुरज चवरकर,राजेंद्र जाधव,आदेश नाईक उपस्थित होते.

# दूषित पाणी, शिळ्या अन्नामुळे 'जीबीएस'चा धोका

## नागरीकांनी काळजी घ्यावी -आयुक्त मंगेश चितळे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पुणे व इतरत्र गुइलेन-बॅरे सिंड्रोम (जीबीएस) या नव्या दुर्मीळ आजाराचे संशयित रुग्ण आढळून येत आहे. दूषित पाणी व शिळ्या अन्नातून जंतू पोटात जातात आणि ते आपल्या पेशींवर हल्ला करून त्या निकामी करतात. त्यामुळे जीबीएसचा धोका निर्माण होतो असे तज्ज्ञांचे मत आहे. या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिका हद्दीतील नागरिकांनी काळजी घ्यावी असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे



यांनी केले आहे.

गुइलेन-बॅरे सिंड्रोमची लक्षणे : या रुग्णांना तीव्र स्वरूपाचे जुलाब , ताप, अंगदुखी अशी लक्षणे सुरुवातीला निर्माण झाली आणि त्यानंतर पायामधील ताकद कमी होणे अशी लक्षणे दिसू लागतात. काही रुग्णांमध्ये अल्प कालावधीमध्ये स्नायूंमधील ताकद कमी होत जाऊन श्वसनाला अडथळा निर्माण व्हायला लागल्याने कृत्रिम श्वसनासाठी त्यांना ICU मध्ये ॲडमिट करावे लागते.

हा गिलियन बॅरी सिंड्रोम आजार काय आहे? या आजाराचा शोध फ्रेंच न्यूरोलॉजिस्ट जॉर्ज गिलीयन आणि जीन अलेक्झेंडर बॅरी आणि यांनी १९१६ साली लावला म्हणून त्यांच्या नावामुळे या आजाराचे नाव गिलियन बॅरी सिंड्रोम असे पडले. हा काही नवीन आजार नाही, भारतामध्ये या आजाराच्या केसेस आढळत असतात. या आजारामध्ये माणसाची स्वतः चीच प्रतिकारशक्ती स्वतःच्या मज्जा संस्थेवरती हल्ला चढवते. शरीरातील नसा आणि स्नायू याचे कार्य त्यामुळे बाधित होते.

एकुणच या रोगाची लक्षणे लक्षात घेता पनवेल महानगरपालिका हद्दीतील नागरिकांनी जेवणापूर्वी व शौचास जाऊन आल्यानंतर हात साबणाने स्वच्छ धुणे, पुर्ण शिजवेले, ताजे अन्न खावे, रस्त्यांवरील उघडे अन्नपदार्थ खावू नये. ज्या ठिकाणी स्वच्छता पाळली जात नाही अशा हॉटेल इतर ठिकाणी, खाणे, पाणी पिणे टाळावे. गिलियन बॅरी सिंड्रोम रोगाची लक्षणे दिसू लागल्यास नजिकच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा असे आवाहन मुख्यक वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी केले आहे.

## सीकेटी महाविद्यालयात कॉमर्शिया महोत्सव उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या वाणिज्य मंडळाचा वार्षिक शैक्षणिक महोत्सव कॉमर्शिया 'Commercia'२०२४-२५' २७ व २८ जानेवारीला उत्साहात साजरा झाला.



या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.एस.के. पाटील यांची उपस्थिती लाभली. वाणिज्य शाखेचे प्रमुख प्रो. डॉ.एस.बी.यादव, व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रो. डॉ.अजय दीक्षित, लेखा व वित्त विभाग प्रमुख डॉ. निलेश कोळी, व्यवस्थापन विभाग प्रमुख प्रा.कुशलकुमार कुराणी आणि वाणिज्य मंडळाच्या प्रमुख डॉ.कीर्ती वर्मा इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

उदघाटन कार्यक्रमावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य एस. के.पाटील यांनी उपस्थितांना संबोधित करताना महाविद्यालयाने विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिलेल्या सोयी सुविधांबाबत माहिती दिली व विद्यार्थ्यांनी स्वतःच्या करिअर वृद्धीसाठी या सुविधांचा उपयोग करण्यास सांगितले. तसेच वाणिज्य शाखेचे प्रमुख एस.बी.यादव यांनी यावर्षीचा शैक्षणिक महोत्सव कॉमर्शिया २०२४-२०२५ बाबत उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या वार्षिक महोत्सवात ब्रांड लोगो डिझाईन, ब्रेन विझार्ड कॉम्पिटिशन, बिझनेस प्लान कॉम्पिटिशन टाईप ओ मास्टर, बिंदास बोल कॉम्पिटिशन, वॉर ऑफ थॉट, आणि कौन बनेगा सेल्स चॅम्पियन इत्यादी स्पर्धांचा समावेश होता. वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये भरघोस प्रतिसाद नोंदविला.

त्याचप्रमाणे, यावर्षी नव्याने सुरू केलेला 'बेस्ट स्टुडन्ट पार्टिसिपेशन वॉर्ड ऑफ कॉमर्शिया २०२४-२५' टी. वाय.बी.एम.एस.ची विद्यार्थिनी ज्योती चौहान हिने पटकावला.

विजेत्या विद्यार्थ्यांना महोत्सवाच्या सांगता कार्यक्रमात प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या महोत्सवाच्या सांगता कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रियांका दुबे या विद्यार्थिनीने केले. तसेच ज्योती फडतरे या विद्यार्थिनीने कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले.

## चार बांगलादेशी नागरिकांना अटक

**पनवेल :** खारघर पोलिसांनी चार बांगलादेशी नागरिकांवर कारवाई करत त्यांना अटक केली आहे. या बांगलादेशी नागरिकांमध्ये एक महिला व तीन पुरुष यांचा समावेश आहे. मोहम्मद अरिफ हुसेन अली, जमाल उस्मान मंडल, पीआरअली रोशन अली मंडल व हसीना पीआरआली मंडल अशी अटक केलेल्या चौघा बांगलादेशींची नावे आहेत. आर एफ कॅम्प खारघर येथे बांगलादेशी नागरिक राहत असल्याची माहिती खारघर पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी छापा टाकून चौघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदान कार्ड सापडले आहेत. ते कोणत्याही परवानगीशिवाय भारतात राहताना मिळून आले. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात पारितोषिक वितरण समारंभ

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शुक्रवारी (दि.३१) सायंकाळी ६ वाजता पारितोषिक वितरण समारंभ व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सी ए जयंत आपटे माजी प्राचार्य शामसुंदरदास सराफ कला व वाणिज्य महाविद्यालय मालाड मुंबई हे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर हे उपस्थित राहणार आहेत तसेच संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय टी देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, परेश ठाकूर कार्यकारी संचालक जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था व संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्रभाकर जोशी, दीपक शिंदे, नेत्रा पाटील, प्रवीण पाटील अनिता पाटील हेही या कार्यक्रमासाठी उपस्थित राहणार आहेत. महाविद्यालयातील सर्व शाखेतील प्रथम द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना तसेच माझी विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या वेगवेगळ्या उपक्रमांमधील यशाबद्दल गौरव करण्यात येणार आहे.

प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे व डॉ. दीपिका हसीजा समन्वयक सांस्कृतिक समिती यांनी या समारंभासाठी व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांना तसेच इतर वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांना, माजी विद्यार्थ्यांना तसेच त्यांच्या पालकांना महाविद्यालयाच्या वतीने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## रोटरी कर्णबधीर मुलांच्या विशेष शाळेत प्रजासत्ताक दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊन चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल संचालित श्रीम राधाबाई खेमंचद परमार रोटरी कर्णबधीर मुलांच्या विशेष शाळेत ७६वा प्रजासत्ताक दिन कार्यक्रम मोठया उत्साहाने व आनंदाने साजरा करण्यात आला. संस्थेचे चेअरमन अरविंद सावळेकर यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले व विद्यार्थ्यांनी ध्वजास मानवंदना दिली.



या वेळी संस्था सचिव प्रमोद वालेकर, क्लब अध्यक्ष ,चारुदत्त भगत, क्लब सचिव तुषार तटकरी, इनरव्हील क्लब अध्यक्ष शुभदा भगत, रोट्रॅक्ट क्लब प्रेसिडेंट मिहिका भगत रो. राजेंद्र ठाकरे, व्ही सी म्हात्रे, चंद्रशेखर पन्हाळे, हितेश राजपूत डॉ. जय भांडारकर, गुरुदेवसिंग कोहली, निलेश पोटे, बी. जी. पाटील, गुमरे, ॲड. दिपाली बोहरा, दिपक कांडपिळे, ऋग्वेद कांडपिळे, वैशाली ठाकरे, शाळेच्या मुख्याध्यापिका शैला बंदसोडे, पालक प्रतिनिधी, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, कर्णबधीर विद्यार्थी व त्यांचे पालक उपस्थित होते. सर्व रोटरी पदाधिकार्यांचे शाळेच्या मुख्याध्यापिका शैला बंदसोडे यांनी पुष्प देऊन स्वागत केले.

विशेष क्षमता महोत्सव २०२५- पनवेल येथे दिव्यांग मुलांच्या नृत्य स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविलेल्या विदयार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला. यानंतर मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. ट्रस्ट चेअरमन अरविंद सावळेकर यांनी सर्व उपस्थितांना आपल्या मनोगतामध्ये प्रजासत्ताक दिनाविषयी विस्तृत माहिती देऊन उपस्थितांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक मुख्याध्यापिका शैला बंदसोडे यांनी केले. सूत्रसंचालन व आभार अरुंधती बंदसोडे यांनी केले.



पनवेल : जनकल्याण सहकारी बँकेला ५० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल बँकेचे उपाध्यक्ष किशोर बागडे, डेप्युटी चीफ मॅनेजर उमेश बुगडे, शाखाध्यक्ष शैला पाटील, मंगेश जाधव यांनी बुधवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेतली. या वेळी त्यांनी बँकेच्या पुढील वाटचालीसाठी उपस्थित बँकेच्या पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.



पनवेल : करंजाडे गावापासून करंजाडे गावदेवीला जाताना हायवे क्रॉस करण्यासाठी स्कायवॉकचे काम सुरू झाले आहे. या कामाची भाजप नेते कर्णा शेलार, सरपंच मंगेश शेलार, उपसरपंच सागर आंग्रे, ग्रामपंचायत सदस्य सूरज शेलार, तुषार नागे, बिपीन गायकवाड आदींनी पाहणी केली.





पनवेल : ॲड. पवन भोईर यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, युवा मोर्चाचे रायगड जिल्हा सरचिटणीस दिनेश खानावकर, विद्यानंद पाटील, मच्छिंद्र भोईर, दशरथ म्हात्रे, रामशेठ पाटील सुदेश फडके, हेमंत माने आदी उपस्थित होते.



पनवेल : खारघर येथे ३१ जानेवारी, १ फेब्रुवारी व २ फेब्रुवारी रोजी मुस्लीम बांधवांचा धार्मिक कार्यक्रम इजतीमाला मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी मोलाचे सहकार्य करणार आहेत. त्याबद्दल त्यांना धन्यवादाचे पत्र देताना सामाजिक कार्यकर्ते अरफात पटेल.

# खारघर पूर्व (तळोजा) येथील सिडकोच्या घरांसाठी अंतिम तारीख ३१ जानेवारी

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

खारघर पूर्व (तळोजा) येथे सिडकोच्या योजनेंतर्गत सहभागासाठी https://cidcohomes.com/ या संकेतस्थळाला भेट द्या. ऑनलाईन नोंदणी आणि पसंतीक्रम सादर करण्यासाठी अंतिम तारीख ३१ जानेवारी २०२५ आहे, असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे.

खारघर पूर्व (तळोजा) हे नवी मुंबईतील सर्वाधिक मागणी असलेल्या स्थळांपैकी एक झाले आहे. मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (छ्चख-), मेट्रो, प्रसिद्ध शैक्षणिक संस्थान, रुग्णालये, शॉपिंग मॉल्स आणि सिडकोच्या माझे पसंतीचे सिडकोचे घर महागृहनिर्माण योजनेसह हे ठिकाण सर्वांनाच आपल्याकडे आकर्षित करीत आहे.

तळोजा-खारघर उड्डाण पूल, हा प्रस्तावित उड्डाणपूल मुंब्रा-पनवेल महामार्गावरील पेंधर फाटा ते खारघर सेक्टर २६ला थेट जोडणार आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी कमी होऊन तळोजा व खारघरदरम्यानच्या प्रवासाचा वेळही कमी होणार आहे.

सिडकोचा ३,१६६ कोटींचा हा प्रकल्प खारघर पूर्व (तळोजा)च्या समग्र कनेक्टिव्हिटीची पुनर्रचना करील. वाशी व खारघर दरम्यानच्या प्रवासाचा वेळ



१५ मिनिटांनी कमी करेल. हा मार्ग तळोजाला आगामी आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि अतल सेतूसोबत जोडेल, तसेच मेट्रो लाईन्स आणि उपनगरीय रेल्वे यांचे मल्टीमोडल ट्रान्सपोर्ट सिस्टममध्ये समावेश करणार आहे.

सिडकोची मेट्रो लाईन १ सीबीडी बेलापूर ते पेंधर दरम्यान ११ उन्नत स्थानकांना जोडते. भविष्यातील विस्तारांमध्ये मेट्रो लाईन २, ३, आणि १२ समाविष्ट आहेत. हे मार्ग लवकरच खारघर पूर्व (तळोजा) ला खांदेश्वर, पनवेल, आणि कल्याणशी जोडतील.

सेंट्रल पार्क सेक्टर २४ मध्ये साकारणार असलेला प्रस्तावित इंटिग्रेटेड स्पोर्ट्स अरेना (ISA) आंतरराष्ट्रीय आणि भारतीय खेळांसाठी जागतिक दर्जाच्या सुविधांची ऑफर देईल. २०.८३ हेक्टर जमिनीवर विस्तारलेला हा प्रकल्प आहे.

खारघरमध्ये आर्ट डिस्ट्रिक्टसाठी महाराष्ट्र सरकार मोफत जमीन उपलब्ध करून देणार आहे, तर केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालय त्याच्या विकासाची देखरेख करणार आहे. मियामी आर्ट डिस्ट्रिक्ट आणि शोरडिचसारख्या आंतरराष्ट्रीय मॉडेल्सपासून प्रेरित असणाऱ्या या आर्ट डिस्ट्रिक्टमध्ये कला दालन, निवास व्यवस्था आणि सांस्कृतिक क्षेत्रांचा समावेश आहे. या आर्ट डिस्ट्रिक्टमुळे युवा कलावंतांना प्रोत्साहन मिळेल, सार्वजनिक कलाकृतींसाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होईल.

त्याचप्रमाणे विविध उपक्रम व त्या संबंधित व्यवसायांद्वारे बुकस्टोअर्स आणि कॅफे सारखे अनेक रोजगार-व्यवसाय निर्माण होतील. खारघरचे सांस्कृतिक महत्त्व देखील या प्रकल्पामुळे वृद्धिंगत होणार आहे.

सिडकोच्या योजनेंतर्गत सहभागासाठी https://cidcohomes.com/ या संकेतस्थळाला भेट द्या. ऑनलाईन नोंदणी आणि पसंतीक्रम सादर करण्यासाठी अंतिम तारीख ३१ जानेवारी २०२५ आहे. सिडकोच्या या अतिमहत्त्वाकांक्षी गृहनिर्माण योजनेत प्रकल्प स्थळे, संकुले व घरे ही विख्यात वास्तूविशारद व आग्रगण्य बांधकाम तज्ज्ञांनी केली आहेत. बांधकामा क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराने निर्माण केलेली आहेत.

## स्वरसंस्कार संगीत विद्यालयाची उत्तुंग भरारी



**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल येथील स्वरसंस्कार संगीत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी यावर्षी अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या परीक्षेमध्ये उत्तम यश मिळविले आहे. यावर्षी विद्यालयाच्या ४१ मुलांना प्रथम श्रेणी व विशेष योग्यता श्रेणी मिळाली आहे, अशी माहिती विद्यालयाच्या संचालिका ॲड. सुरेखा प्रशांत भुजबळ (संगीत विशारद) यांनी दिली.

गेल्या १० वर्षापासून स्वरसंस्कार संगीत विद्यालय उत्तम विद्यार्थी घडवत आहेत. या विद्यालय अंतर्गत शास्त्रीय गायनासोबत, सुगम संगीत, तबला, पेटी ई. अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या परीक्षेनुसार शिकवले जाते. तसेच गिटार,पाश्च्यात्य नृत्य, भरतनाट्यम, अबॅकस तसेच योगा आणि झुंबाचे वर्ग घेतले जातात.१२५ पेक्षा अधिक विद्यार्थी या विद्यालयात गायन, वादन, नृत्य व अबॅकस, झुंबा, योगावर्गचा लाभ घेत आहेत.

विद्यार्थांना मिळालेल्या यशाबद्दल सर्व पालकांनी स्वरसंस्कार विद्यालयाच्या संचालिका ॲड. सुरेखा प्रशांत भुजबळ यांचे भरभरून कौतुक केले व आभार मानले.

## संपादकीय

# कोटींच्या गर्दीचे आव्हान

प्रयागराजमधील महाकुंभ मेळ्यात मंगळवार–बुधवार दरम्यानच्या रात्री एक–दोनच्या सुमारास मौनी अमावस्येच्या निमित्ताने अमृतस्नानासाठी गर्दी वाढल्याने चेंगराचेंगरीची दुर्दैवी घटना घडली. या दुर्दैवी घटनेत ३० भाविक मृत्यूमुखी पडले असून ६० जण जखमी झाल्याचे बुधवारी संध्याकाळी उत्तर प्रदेश प्रशासनाकडून सांगण्यात आले. यापूर्वीही अनेकदा कुंभमेळ्यांमध्ये पराकोटीची काळजी घेऊन व चोख व्यवस्था ठेवूनही अफाट गर्दीमुळे अशा दुर्घटना घडल्या आहेत. निष्पाप भाविकांचा अशातऱ्हेने बळी गेल्याबद्दल सगळ्यांकडूनच दु:ख व्यक्त केले जात आहे.

**मौनी अमावस्या हा महाकुंभ मेळ्यात शाही स्नानाचा दिवस असल्याने अमृतस्नानासाठी संगमतीरावर भाविकांची मोठी गर्दी होत असते. प्रयागराजमधील महाकुंभ मेळ्यात सध्या ८ ते १० कोटी भाविक आहेत, असे सांगितले जाते. घाटाच्या परिसरात कुणीही खाली झोपू नये अशा सूचना एका वरिष्ठ अधिकाऱ्याने मंगळवारी रात्री लाऊडस्पीकरवरून वारंवार दिल्या होत्या. अधिकारी सूचना देतानाचा व्हिडिओही वायरल आहे, परंतु दुर्दैवाने काही लोकांनी त्यांच्या सुचनांकडे दुर्लक्ष केल्याने खाली झोपलेल्या लोकांना अडखळून काही भाविक खाली पडले व त्यानंतर चेंगराचेंगरी झाली असा अंदाज आहे. तर, संगम तीरावर काही लोकांनी बॅरिकेड ओलांडण्याचा प्रयत्न केल्याने गोंधळ निर्माण होऊन चेंगराचेंगरी घडली असावी असेही काहींचे म्हणणे आहे. नेमके काय घडले हे अधिक चौकशीत समोर येईलही कदाचित, परंतु या दुर्दैवी अपघातात ३० भाविक आपले प्राण गमावून बसले आहेत. पुण्य पदरी जमा करण्याच्या हेतूने व आप्तस्वकीयांच्या भल्याकरिता प्रार्थना करण्याकरिता महाकुंभ मेळ्याला भेट देणाऱ्या भाविकांचा अशातऱ्हेने बळी गेल्याबद्दल सगळ्यांनाच दु:ख वाटते आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेचे वृत्त समजताच 'एक्स'वर पोस्ट करून दु:ख व्यक्त केले. व्हीआयपींच्या बडदास्तीत प्रशासन मश्गुल असल्यामुळे ही घटना घडल्याची टीका काही संतांनी व विरोधकांनीही केली, परंतु दुर्दैवी घटना घडली तेव्हा कोणीही व्हीआयपी त्या परिसरात नव्हते असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. चेंगराचेंगरीच्या या घटनेनंतर अनेकांना १९५४ साली मौनी अमावस्येलाच कुंभमेळ्यात घडलेल्या दुर्घटनेचे स्मरण झाले. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरचा तो पहिलाच कुंभमेळा होता. त्यावेळी संगम घाटावर एक हत्ती नियंत्रणाबाहेर गेल्यामुळे गोंधळ उडून झालेल्या चेंगराचेंगरीत ५०० जण मृत्युमुखी पडले होते. त्या घटनेला तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू जबाबदार असल्याचा आरोपही झाला होता. नेहरू संगम घाटावर शाही स्नानासाठी गेल्याने सामान्यांना रोखून ठेवले गेले. त्यामुळे गर्दी आटोक्याबाहेर गेली अशी टीका झाली, परंतु नेहरू आदल्या दिवशी स्नानासाठी गेल्याचा खुलासा नंतर करण्यात आला. तेव्हापासून व्हीआयपींच्या संगमावरील भेटी रद्द करण्यात आल्या. आजही कुंभ, अर्धकुंभ व महाकुंभ मेळ्यात हा नियम पाळला जातो. त्यानंतर १९८६ साली कुंभमेळ्यातील चेंगराचेंगरीत २०० लोकांचा तर, नाशिकमध्ये २००३ साली कुंभमेळ्यातील चेंगराचेंगरीत ३९ लोकांचा मृत्यू झाला होता. २०१० सालीही हरिद्वार येथे साधू आणि भाविकांच्या संघर्षात चेंगराचेंगरी होऊन सात लोकांचा मृत्यू झाला तर २०१३ साली प्रयागराज येथे अलाहाबाद रेल्वेस्थानकावरील चेंगराचेंगरीत ४२ लोक मृत्युमुखी पडले होते. आता यापुढील काळात महाकुंभ मेळ्यातील गर्दीच्या नियोजनाची जबाबदारी भारतीय सैन्याकडे सोपवावी, अशी मागणीही होते आहे. यावर्षीच्या महाकुंभ मेळ्याला ४० कोटींहून अधिक लोक भेट देतील असा अंदाज असून गर्दीच्या नियोजनाचे आव्हान खरोखरीच मोठे आहे.**

# राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची पुण्यतिथी

महात्मा मोहनदास करमचंद गांधी (२ ऑक्टोबर १८६९ – ३० जानेवारी १९४८) हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेते होते. त्यांना भारतात राष्ट्रपिता म्हणून ओळखले जाते. त्यांनी अहिंसा आणि सत्याग्रह या तत्वज्ञानाच्या आधारे ब्रिटिश राजवटीविरुद्ध संघर्ष केला.

गांधीजींचा जन्म पोरबंदर येथे २ ऑक्टोबर १८६९ रोजी झाला. त्यांचे वडील करमचंद गांधी हे पोरबंदर संस्थानाचे दिवाण होते. त्यांच्या आईचं नाव पुतळीबाई होतं, जी धार्मिक आणि सद्गुणी महिला होती. त्यांच्या बालपणातच त्यांच्यावर धार्मिकतेचा आणि नैतिकतेचा प्रभाव पडला. १८८८मध्ये गांधीजी इंग्लंडला गेले आणि तिथे कायद्याचे शिक्षण घेतले. १८९१ मध्ये ते वकिलीची पदवी घेऊन भारतात परतले, परंतु भारतात त्यांना विशेष यश मिळाले नाही.


१८९३ साली एका कायदेशीर प्रकरणासाठी ते दक्षिण आफ्रिकेत गेले. तिथे त्यांनी भारतीय लोकांवरील वर्णद्वेषाचा अनुभव घेतला, ज्यामुळे ते राजकीय आणि सामाजिक कार्यात सक्रिय झाले. त्यांनी तिथे सत्याग्रहाची संकल्पना राबवली, जी पुढे भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वाची ठरली.

गांधीजी १९१५ साली भारतात परतले. त्यानंतर त्यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी असहकार आंदोलन (१९२०), दांडी यात्रा (१९३०) आणि भारत छोडो आंदोलन (१९४२) या प्रमुख आंदोलनांचे नेतृत्व केले. गांधीजींनी नेहमीच अहिंसेचा मार्ग अवलंबला आणि सामान्य लोकांमध्ये एकजूट निर्माण केली.

महात्मा गांधी यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली असली तरी त्यांचे सामाजिक कार्यदेखील तितकेच प्रभावी होते. त्यांनी भारतातील सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक समस्यांवर लक्ष केंद्रित केले आणि अनेक समाजसुधारणा चळवळींचे नेतृत्व केले.

महात्मा गांधींनी अस्पृश्यतेच्या विरोधात मोठ्या प्रमाणावर लढा दिला. त्यांच्या मते अस्पृश्यता हे सामाजिक विष आहे आणि मानवतेविरुद्धचा अपराध आहे. त्यांनी दलितांना हरिजन (भगवानाचे लोक) असे नाव दिले आणि समाजात त्यांचा सन्मान मिळवण्यासाठी काम केले. अस्पृश्य लोकांना मंदिरात प्रवेश, पाण्याच्या स्त्रोतांचा वापर करण्याचे अधिकार मिळवून देण्यासाठी त्यांनी विविध आंदोलने केली.

गांधीजींचे सत्याग्रहाचे तत्वज्ञान म्हणजे सत्याच्या मार्गाने आणि अहिंसेच्या आधारे अन्यायाचा प्रतिकार करणे. त्यांनी समाजातील विषमतेविरुद्ध आणि ब्रिटीश राजवटीविरुद्ध सत्याग्रहाचे हत्यार वापरले. अहिंसेच्या माध्यमातून त्यांनी समाजातील विविध घटकांना एकत्र आणून सामाजिक एकता निर्माण केली.



गांधीजींनी ग्रामस्वराज्याची संकल्पना मांडली, ज्यामध्ये ग्रामीण विकासाला प्राधान्य दिले. त्यांनी खादीचा प्रसार केला आणि स्वदेशी वस्तूंचा वापर करण्यावर भर दिला. त्यांच्या मते, भारतीय समाजाची खरी ताकद ग्रामीण भागात आहे आणि स्वावलंबन हेच आत्मनिर्भर भारताचे मुख्य साधन आहे.

महात्मा गांधींनी महिलांच्या सशक्तीकरणावर देखील मोठ्या प्रमाणात भर दिला. त्यांनी स्त्रियांना स्वातंत्र्य चळवळीत भाग घेण्याचे आवाहन केले. त्यांच्या मते, स्त्रियांच्या सहभागाशिवाय कोणतेही समाज सुधारकामध्ये यश मिळवणे शक्य नाही. त्यांनी बालविवाह, पर्दा प्रथा आणि स्त्रियांचे शोषण या समस्यांवर आवाज उठवला.

भारत हा विविध धर्मांचा आणि जातांचा देश आहे. महात्मा गांधींनी धर्मांमध्ये शांतता आणि जातीय सलोख्याचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी हिंदू–मुस्लिम ऐक्याचे समर्थन केले आणि सर्वधर्मसमभावाचे तत्वज्ञान मांडले. त्यांनी अनेक वेळा जातीय दंगली रोखण्यासाठी उपोषण आणि सत्याग्रह केले.

महात्मा गांधींनी मद्यपानाच्या विरोधात प्रचार केला. त्यांच्या मते, मद्यपान हे समाजातील अनेक समस्यांचे मूळ आहे, ज्यामुळे कुटुंबाचे जीवन उद्ध्वस्त होते. त्यांनी समाजातील लोकांना मद्यपान सोडण्याचे आवाहन केले आणि त्यासाठी अभियान चालवले.

गांधीजींनी मुलभूत शिक्षण आणि रोजगाराभिमुख शिक्षणावर भर दिला. त्यांचा विश्वास होता की शिक्षण हे प्रत्येकाच्या जीवनात महत्त्वाचे आहे आणि समाजातील प्रत्येक व्यक्तीला शिक्षण मिळाले पाहिजे. त्यांनी नैतिक शिक्षणावर आणि हस्तकलेच्या शिक्षणावर विशेष भर दिला.चरहरींर ऋरपवहळ खपषीरींळेप खप चरीरींहळ

स्वराज्य म्हणजेच स्वतःचे राज्य किंवा स्वतंत्र राज्य हा महात्मा गांधी यांच्या स्वातंत्र्य चळवळीतील एक प्रमुख संकल्पना होती. गांधीजींनी स्वराज्याच्या संकल्पनेत केवळ ब्रिटिश राजवटीपासून मुक्तता नव्हे तर आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक स्वावलंबनाचा विचार मांडला. त्यांचे मत होते की स्वराज्य म्हणजे केवळ राजकीय स्वातंत्र्य नसून, जनतेने आत्मनिर्भर होणे आणि शोषणमुक्त समाज स्थापन करणे आवश्यक आहे.

गांधीजींनी स्वदेशी चळवळीद्वारे लोकांना परकीय वस्तूंचा त्याग करून देशात तयार झालेल्या वस्तू वापरण्याचा सल्ला दिला. त्यांनी खादीचा वापर करण्यावर जोर दिला, कारण खादी हे स्वावलंबनाचे प्रतीक होते. स्वराज्य मिळवण्यासाठी त्यांनी अहिंसा, सत्याग्रह आणि नागरिक नकाराचे मार्ग वापरले.

मिठाचा सत्याग्रह हा महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली ब्रिटिश सरकारच्या अन्यायकारक मीठ कायद्याविरुद्ध केलेला ऐतिहासिक अहिंसक आंदोलन होता. १२ मार्च १९३० रोजी गांधीजींनी गुजरातमधील साबरमती आश्रमातून सुरू केलेली दांडी यात्रा म्हणजेच मिठाचा सत्याग्रह, स्वराज्याच्या चळवळीतील एक महत्त्वपूर्ण घटना होती.

ब्रिटीश सरकारने भारतीयांना समुद्रातून मीठ तयार करण्यावर बंदी घातली होती आणि त्यासाठी कर लावला होता. हा कर अन्यायकारक होता, कारण मीठ हा गरिबांच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचा घटक होता. गांधीजींनी या कायद्याचा निषेध करण्यासाठी २४ दिवस चालत २४० मैलांचा प्रवास केला आणि ६ एप्रिल १९३० रोजी गुजरातमधील दांडी येथे समुद्रकिनाऱ्यावर पोहोचून मिठाचे उत्पादन करून कायद्याचे उल्लंघन केले.

मिठाचा सत्याग्रह हा ब्रिटिशांविरुद्धचा नागरिक नकाराचा एक प्रतीकात्मक आणि अहिंसक मार्ग होता. या आंदोलनाने संपूर्ण भारतभर लोकांना प्रेरणा दिली आणि स्वातंत्र्याच्या लढ्यात मोठा टप्पा गाठला. यामुळे स्वराज्य चळवळीत सामील होण्यासाठी सामान्य जनतेचा सहभाग वाढला आणि ब्रिटिश सरकारवरील दबाव वाढला. चरहरींर ऋरपवहळ खपषीरींळेप खप चरीरींहळ

माझे सत्याचे प्रयोग हे गांधीजींचे आत्मचरित्र आहे, ज्यामध्ये त्यांनी आपल्या जीवनातील सत्य आणि अहिंसेच्या तत्त्वज्ञानाशी संबंधित प्रयोग मांडले आहेत. हे पुस्तक त्यांच्या जीवनातील विविध प्रसंगांवर आधारित आहे, ज्यामध्ये त्यांनी व्यक्तिगत आणि राजकीय आयुष्यात सत्याचा कसा पाठपुरावा केला, हे उलगडले आहे.

भारतातील स्वातंत्र्य लढ्याच्या यशस्वी नेतृत्वासाठी आणि त्यागासाठी महात्मा गांधींना राष्ट्रपिता ही उपाधी दिली जाते. भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि इतर नेत्यांनी त्यांच्या योगदानाची ही उपाधी दिली.

टाइम मॅगझिनचे पर्सन ऑफ द इयर (१९३०): १९३० मध्ये, टाइम मॅगझिनने महात्मा गांधी यांना पर्सन ऑफ द इयर म्हणून गौरविले होते. दांडी यात्रेतील त्यांच्या नेतृत्वामुळे त्यांना हा सन्मान मिळाला.

नोबेल शांतता पुरस्कारासाठी नामांकन (१९३७–१९४८): महात्मा गांधींना पाच वेळा नोबेल शांतता पुरस्कारासाठी नामांकित केले गेले होते, परंतु त्यांना हा पुरस्कार मिळाला नाही. तरीही, नोबेल समितीने त्यांच्या कार्याचा मोठा आदर केला आणि त्यांनी केलेल्या शांततापूर्ण प्रयत्नांचे कौतुक केले.

नोबेल शांतता पुरस्काराच्या बदलत्या निवड प्रक्रियेत उल्लेख: १९४८ साली गांधीजींना मरणोत्तर नोबेल शांतता पुरस्कार देण्याचा विचार केला गेला, परंतु तेव्हा नोबेल समितीने मरणोत्तर पुरस्कार देणे बंद केले होते, त्यामुळे हा पुरस्कार दिला गेला नाही.

युनेस्कोचा शांती पुरस्कार: १९६९ मध्ये, महात्मा गांधींना त्यांच्या अहिंसेच्या कार्यासाठी युनेस्कोच्या शांती पुरस्काराने मरणोत्तर सन्मानित करण्यात आले.

भारतात २ ऑक्टोबर हा गांधी जयंती म्हणून साजरा केला जातो, आणि संयुक्त राष्ट्र संघाने २ ऑक्टोबर हा दिवस आंतरराष्ट्रीय अहिंसा दिवस म्हणून घोषित केला आहे. ३० जानेवारी १९४८ रोजी महात्मा गांधींची हत्या करण्यात आली. **(साभार : लेख मराठी)**



## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सअ‍ॅपवर 'हे' नंबर करा सेव्ह, रेल्वे प्रवासात सेवा




अनेकदा बाहेरच्या लांब पल्ल्याचा प्रवास करण्यासाठी बहुतेकजण रेल्वेने प्रवास करण्याचा पर्याय निवडतात. तुम्हीसुद्धा गावी जाताना किंवा बाहेर फिरायला जाताना रेल्वेने प्रवास करत असाल तर ही बातमी तुमच्यासाठी आहे. तुम्हाला रेल्वेतील सगळ्या सेवा या अगदी सहज मिळू शकतात. आता तुम्ही म्हणाल हे कसं शक्य आहे, तर तुम्हाला फक्त हे तीन व्हॉट्सअ‍ॅप नंबर तुमच्या फोनमध्ये सेवा करून ठेवावे लागतील. ते तुम्हाला प्रवास करताना खूप उपयुक्त ठरतील.

रेल्वेचे तिकीट बुक करण्यापासून ते ट्रेनमध्ये बसून जेवण मागवण्यापर्यंत तसेच तुम्हाला प्रवास करताना काही दुखापत किंवा आजारी पडल्यास डॉक्टरांना फोन करण्यापर्यंत तुमची सर्व कामे या तीन नंबरच्या सहाय्याने केली जाणार आहे. तर हे तीन नंबर तुमचा जीव आणि वेळ हे दोन्ही वाचवू शकतात. आता या तीन व्हॉट्सअ‍ॅप नंबरचा तपशील आणि तुम्ही त्याचा वापर कसा करू शकता, याविषयी माहिती जाणून घेऊयात.

९८८११९३३२२ : व्हॉट्सअ‍ॅपच्या माध्यमातून रेल्वे तिकीट बुक करायचे असेल तर हा नंबर फोनमध्ये सेव्ह करा. या नंबरवरून तुम्ही ट्रेनचे तिकीट बुक करू शकता. तुम्ही ट्रेनचे पीएनआर स्टेटस तपासू शकता. तुम्ही ट्रेनचे लाईव्ह स्टेटस पाहू शकता. याव्यतिरिक्त, तुम्ही ट्रेनचे वेळापत्रक इत्यादी तपासू शकता.

८७५०००१३२३ : ट्रेनमध्ये बसून भूक लागली तर काळजी करू नका, तुम्ही सीटवर बसून जेवण मागवू शकता. यासाठी तुम्हाला फक्त हा नंबर तुमच्या फोनमध्ये सेव्ह करावा लागेल. त्यानंतर तुम्हाला व्हॉट्सअ‍ॅपवर मेसेज पाठवावा लागेल. ऑन–स्क्रीन सूचना आणि प्रश्नांची उत्तरे देऊन तुम्ही जेवण ऑर्डर करू शकता.

१३८ : ट्रेनमध्ये तुमची किंवा इतर कोणाची तब्येत बिघडली तर या नंबरच्या माध्यमातून डॉक्टरची सेवा मिळू शकते. अगदी पुढच्या स्टेशनवर तुम्हाला डॉक्टरांची टीम सापडेल, जे तुमच्या गरजेनुसार आणि परिस्थितीनुसार तुम्हाला हाताळतील.

# गायक, व्हायोलिनवादक पं. गजाननबुवा जोशी

## निमित्त



गायक, व्हायोलिनवादक व गुरू म्हणून सुविख्यात असणाऱ्या पं. गजाननराव अनंत जोशी यांचा जन्म मुंबईतील गिरगाव येथे ३० जानेवारी १९११ झाला. त्यांच्या आईचे नाव इंदिराबाई होते. त्यांचे घरगुती नाव 'राम' असे होते. पं. गजाननबुवांच्या घराण्यात संगीताची परंपरा होती. गजाननबुवांचे आजोबा मनोहरपंत हे सुमारे १८५०–१८७० या काळातील गायक होते. त्यांनी इचलकरंजीच्या रावजीबुवा गोगटे यांच्याकडे तालीम घेतली होती, तर वडील अनंत मनोहर जोशी तथा अंतूबुवा हे ग्वाल्हेर घराण्याचे उत्तम गायक म्हणून विख्यात होते.


वडील अंतूबुवा हेच गजाननबुवांचे पहिले गुरू होते. गिरगावात अंतूबुवांचे श्रीसमर्थ गायन वादन विद्यालय होते. त्यामुळे गजाननबुवांवर बालवयातच संगीताचे संस्कार झाले. अंतूबुवांच्या पत्नी व मुलांचे पाठोपाठ आकस्मिक निधन झाल्याने ते विद्यालय बंद करून प्रथम सांगलीस आले व नंतर त्यांची नेमणूक औंध संस्थानात दरबार गायक म्हणून झाली. वडिलांकडून गजाननबुवांना पारंपरिक पद्धतीने गायनाची तालीम मिळाली. शिवाय तबला, हार्मोनिअम ही वाद्येही सरावाची झाली. लहानपणी ते जलतरंग हे वाद्य अत्यंत तयारीने वाजवीत.

दहा वर्षांच्या छोट्या गजाननाचा जलतरंगवादनाचा पहिला कार्यक्रम औंधमध्ये भवानराव पंतप्रतिनिधींनी आयोजित केला व ते वादन संपूर्ण संस्थानामध्ये कौतुक व कुतूहलाचा विषय होता. औंधचे राजे पंतप्रतिनिधी यांनी स्वत:च्या कीर्तनाच्या साथीसाठी गजाननास हे वाद्य वाजवण्याची आज्ञा केली. वयाच्या तेराव्या–चौदाव्या वर्षी १९२३च्या आसपास गजाननाने व्हायोलिन हे वाद्य हाती घेतले व स्वत:च्या एकलव्य परिश्रमाने साध्य केले. गजाननबुवांनी रूढ अर्थाने कोणाकडेही व्हायोलिनवादनाचे शिक्षण घेतले नव्हते. त्या काळात हिंदुस्थानी संगीतात या वाद्याचा प्रसार विशेष झाला नव्हता व हे वाद्य अल्पपरिचित होते. या वाद्यावर उत्तर हिंदुस्थानी रागसंगीताचा आविष्कार करणाऱ्या कलाकारांच्या पहिल्या पिढीतील गजाननबुवा जोशी हे एक अग्रश्रेणीचे कलाकार म्हणून नावाजले गेले. त्यांचे १९२८पासून मुंबई रेडिओवर कार्यक्रम होऊ लागले. प्रभात फिल्म कंपनीच्या 'अयोध्येचा राजा' या पहिल्या बोलपटाच्या वाद्यवृंदात ते १९३०मध्ये सहभागी होते.

व्हायोलिनच्या स्वतंत्र मैफलींबरोबर पं. रविशंकर व उ. विलायत खाँ यांच्यासह केलेल्या जुगलबंदीच्या मैफलीही त्या काळी खूप गाजल्या. तत्कालीन महाराष्ट्रात व्हायोलिन म्हणजे पं. गजाननराव जोशी असे समीकरण सिद्ध करणाऱ्या बुवांनी वादनाची एक स्वतंत्र शैली निर्माण केली. या पाश्चात्त्य वाद्यावर भारतीय रागसंगीताच्या प्रस्तुतीचे तंत्र व ढाचा त्यांनी तयार केला. व्हायोलिनसाठी त्यांनी खास अशा अनेक गतींच्या रचनाही केल्या. 'भारताचा यहुदी मेनुइन' म्हणून गजाननबुवांचा गौरव करण्यात आला.

गजाननरावांचा विवाह दुर्गाबाई यांच्याशी झाला (१९३३). त्यांना तीन मुले व तीन मुली. त्यांचे मनोहर, मधुकर हे पुत्र आणि कन्या सुचेता बिडकर (मालिनी जोशी) प्रसिद्ध गायक आहेत, ते व्हायोलीनवादनही करतात. धाकटे पुत्र नारायण तबला वादक. गजाननबुवांचे २८ जून १९८७ रोजी डोंबिवली येथे निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

## बातमीतील बात






# आरोग्य प्रहर

## निरोगी डोळ्यांसाठी आरोग्यदायी टिप्स



डोळे चांगले ठेवण्यासाठी निरोगी व संतुलित आहार घ्या. तुमच्या आहारात भरपूर किंवा फळे आणि भाज्यांचा समावेश करा, विशेषतः हिरव्या पालेभाज्या आणि ओमेगा–३ फॅटी ॲसिडचे प्रमाण जास्त असलेले पदार्थ खाल्ल्याने डोळ्यांना फायदा होतो.

जास्त वजन किंवा लठ्ठपणामुळे मधुमेह होण्याचा धोका वाढतो. मधुमेहामुळे डायबेटिक रेटिनोपॅथी किंवा काचबिंदू होण्याचा धोका जास्त असतो. म्हणून वजन आटोक्यात ठेवा.

व्यायामामुळे मधुमेह, उच्च रक्तदाब आणि उच्च कोलेस्टेरॉल नियंत्रित ठेवण्यात मदत होऊ शकते. या आजारांमुळे डोळ्यांच्या किंवा दृष्टीच्या काही समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे नियमित व्यायाम करणे आवश्यक आहे.

तीव्र सूर्यप्रकाशामुळे डोळे खराब होऊ शकतात आणि मोतीबिंदू आणि मॅक्युलर डिजेनेरेशनचा धोका वाढू शकतो. UVAA आणि UVAB दोन्ही रेडिएशन ९९ ते १००% रोखतील असे सनग्लासेस वापरून डोळ्यांचे संरक्षण करा.

काही खेळ खेळताना किंवा जोखमीचे काम करताना डोळ्यांचे संरक्षण आवश्यक आहे.

धुम्रपान टाळा. धूम्रपानामुळे मॅक्युलर डिजेनेरेशन आणि मोतीबिंदू असे डोळ्यांचे आजार होण्याचा धोका वाढतो आणि ऑप्टिक नर्व्हचे नुकसान होऊ शकते.

डोळ्यांचे काही आजार अनुवांशिक असतात. त्यामुळे तुमच्या कुटुंबातील कोणाला डोळ्यांचे विकार असल्यास नियमितपणे डोळ्यांची तपासणी करून घ्या. डोळ्यांचे आजार व उपचार जाणून घ्या.


कॉन्टॅक्ट लेन्सेस वापरत असल्यास संक्रमण टाळण्यासाठी कॉन्टॅक्ट लॅन्ड घालताना आधी आपले हात स्वच्छ धुवा. तसेच लेन्सना योग्यरित्या कसे स्वच्छ करावे यावरील सूचनांचे अनुसरण करा आणि आवश्यकतेनुसार बदला.

जर तुम्ही संगणक बराच वेळ बघत असाल तर तुम्ही डोळे मिचकावणे विसरू शकता आणि तुमचे डोळे थकू शकतात. डोळ्यांवर येणारा ताण कमी करण्यासाठी २०–२०–२० हा नियम वापरून पहा: दर २० मिनिटांनी, २० सेकंदांसाठी आपल्या समोर सुमारे २० फूट दूर पहा. डोळ्यांची नजर वाढवण्यासाठी हा उपाय करा.

# वासांबे येथील शेतकरी होणार 'स्मार्ट'

## ॲग्रीस्टॅक नोंदणी केंद्राचा शुभारंभ

## शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकरी कार्ड



**चौक : प्रतिनिधी**

स्मार्ट शेतकरी ॲग्रीस्ट्रॅक नोंदणी केंद्राचा शुभारंभ वासंबे ग्राम पंचायत सरपंच उमा मुंढे यांच्या हस्ते मंडळ कार्यालयात करण्यात आला. यावेळी महसूल मंडळातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


शासनाने शेतकरी यांच्यासाठी आणलेली स्मार्ट शेतकरी योजना असून ज्यांच्या नावावर मालकी हक्काचे शेतीचे ७/१२ आहेत त्यांच्यासाठी ही योजना आहे.यामुळे कोणत्याही योजनेचे कागद पत्र जमा करण्यास शेतकऱ्यांना त्रास होणार नाही, त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन सरपंच उमा मुंढे यांनी केले. हे नोंदणी केंद्र निःशुल्क आहे,

वासांबे मंडळातील शेतकऱ्यानी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळ अधिकारी श्रीनिवास खेडेकर यांनी केले आहे. तसेच जवळच्या ई सेवा केंद्रावर सुद्धा हे निः शुल्क आहे. आधार कार्ड, मालकी हक्काचे ७/१२ उतारे, आधार कार्ड लिंक साठी स्मार्ट मोबाईल फोन गरजेचा आहे. तसेच हा विभाग मोठा असल्याने तीन केंद्राची निर्मिती करण्यात येत आहे, असे तलाठी अभिजित हिरवरकर यांनी सांगितले.

महसूल मंडळातील शेतकरी यांच्यासाठी दररोज सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत ॲग्रीस्ट्रॅक योजना केन्द्र सूरू रहाणार आहे. नोंदणी झाल्यावर अधिकृत कार्ड मिळणार असुन त्याचा लाभ शेती योजनांसाठी होणार असून त्याच कार्ड मधून आपल्या शेतीची माहिती मिळणार आहे. शेतीवर कर्ज घेणे, किसान पीक विमा योजना, नैसर्गिक आपत्ती, सर्व शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकरी कार्ड चा उपयोग होणार आहे.

या वेळी मंडळ अधिकारी श्रीनिवास खेडकर, तलाठी अभिजित हिवरकर, तेजस देशमुख, योगेश देशमुख, राजेश साबळे यांच्या सह ग्रामस्थ, शेतकरी उपस्थित होते.

## मुरूडला १७२ रुग्णांची मोफत तपासणी



**मुरुड : प्रतिनिधी**

ग्रामीण रुणालय मुरूड, संजीवनी आरोग्य सेवा केंद्र व मरूड तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनांतर्गत दि .२९ जानेवारी अस्थिरोग तज्ज्ञ डॉ .प्रविण बागुल व संजीवनी आरोग्य सेवा केंद्राचे विभागप्रमुख डॉ मकबुल कोकाटे ,कार्याध्यक्ष विजय सुर्वेयांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन सोहळा पार पडला .

यावेळी संजीवनी संस्थेचे पदाधिकारी चंद्रकांत अपराध,शकील कडू,कीर्ती शहा,राशीद फहीम,रोहिदास मकू,आदेश दांडेकर अजीत गुरव,मंगेश दांडेकर आदी मान्यवर उपस्थितहोते.सदरआरोग्य शिबिरात भिषक, अस्थिरोग,स्त्री-रोग,बालरोग,नाक कान,घसा,दंत व नेत्रचिकित्सा आदी व्याधी असलेल्या रुग्णांवरतज्ञ डॉक्टरांकडून १७२रुग्णांचीमोफत तपासणी करण्यात आली .


यामध्येडॉ.प्रविण बागुल,डॉ.वैभव पाटील,डॉ सुभाष पाटील,डॉ. सुबोध धोंगडे ,डॉ श्रीराम गोखले,डॉ.शेखर वानखेडे, डॉ.नेहा शेळके,डॉ.नबील हमीद,तालुका आरोग्य अधिकारीडॉ.पायल राठोड, वैद्यकिय अधिक्षकडॉ.उषा चौलेआदींचा सहभाग होता .

शिबीर यशस्वीतेसाठी ग्रामीण रुणालय ,संजीवनी संस्था व तालुका आरोग्य अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## कोलाड रोहा मार्गावर स्कूटी व कारचा अपघात

**रोहा : रामप्रहर वृत्त**

कोलाड रोहा मार्गावर संभे एस.टी. स्टॉपचे पुढे सोमवारी सायंकाळी ७ वाजता स्कुटी व कारचा झालेल्या अपघातात स्कुटी चालक गंभीर जखमी झाला.




रोहा बंगले आळीत रहाणारा आरोपी चालक इरटिगा कार घेउन कोलाड ते रोहा जात असतांना वळणाच्या रस्त्यावर बेदरकारपणे वेगात वाहन चालवत विरुध्द दिशेला जाउन समोरुन येणाऱ्या स्कुटीला धडक दिली

या अपघातात स्कुटी चालक गंभीर जखमी झाला आहे. कोलाड पोलिस ठाणे येथे दाखलकरण्यात आला असून अधिक तपास पोहवा गायकवाड हे करीत आहेत.


### महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग माणगाव
**ई-निविदा सुचना (दुसरी मागणी) क्र. ७ सन २०२४-२५**

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विभाग, माणगाव यांचेकडून खालील कामाकरिता ई-निविदा सुचना मागविण्यात येत आहे. जलजीवन मिशन अंतर्गत **फणसाड प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ता. मुरुड जि. रायगड,** पंपिग मशिनरीसाठी तरंगता तराफा उभारणी करणे कामाबाबत. कामाची अंदाजित किंमत **रू. १,००,९७,२००/-**

कामासंबंधीचा सविस्तर तपशील दि. ३०/०१/२०२५ पासून www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

दिनांक : २०/०१/२०२५

सही/-
(एच. आर. नागदे)
कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
विभाग माणगाव.



### पनवेल महानगरपालिका
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com
जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.४२/४२/२०२५ दि. २९/०१/२०२५

#### नागरिकांना जाहिर आवाहन

पनवेल शहरातील नागरिकांना सुचित करण्यात येते की, पनवेल शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील पाणीपुरवठा **सोमवार दि. ०३/०२/२०२५ सकाळी ९.०० ते मंगळवार दि.०४/०२/२०२५ रोजी सकाळी ९.००** वाजेपर्यंत २४ तास बंद राहणार आहे. त्यामुळे शहरामध्ये सदर दिवशी खालीलप्रमाणे पाणीपुरवठा करण्यात येणार आहे.

**अ) सोमवार दि. ०३/०२/२०२५ रोजी खालील भागात पाणी पुरवठा सुरू राहिल.**

१) हरिओमनगर उंच जलकुंभ, ठाणानाका रोड उंच जलकुंभ, एच.ओ.सी. उंच जलकुंभ, व चौकोनी टाकी, मार्केटयार्ड उंच जलकुंभ येथुन होणारा पाणीपुरवठा सुरू राहिल व उर्वरित भागातील पाणीपुरवठा बंद राहिल.

**ब) मंगळवार दि. ०४/०२/२०२५ रोजी खालील भागात पाणी पुरवठा सुरू राहिल**

१) गंगाराम सिनेमा उंच जलकुंभ, भाजी मार्केट उंच जलकुंभ, सर्व्हिस हौद नवीन उंच जलकुंभ (गोलटाकी) व पटेल मोहल्ला उंच जलकुंभातुन होणारा पाणीपुरवठा सुरू राहिल व उर्वरित भागातील पाणीपुरवठा बंद राहिल.

तसेच पुढील २ ते ३ दिवस कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे. तरी नागरिकांनी याची नोंद घेवून मिळणारे पाणी जपून वापरावे, पाण्याचा अपव्यय टाळावा व महानगरपालिकेस सहकार्य करावे ही विनंती.

सही/-
शहर अभियंता
पनवेल महानगरपालिका



### उरण नगरपरिषद
**जिल्हा - रायगड, पिन कोड-४००७०२**

**प्रथम संक्षिप्त ई - निविदा सुचना क्रमांक /बांवि/०९/२०२४-२५**

उरण नगरपरिषद क्षेत्रातील खालील कामाची संपूर्ण तपशिलासह सविस्तर ई-निविदा https://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| (१) | उरण नगरपरिषदेचे सर्वोदयवाडी-उरण येथील बायोगॅस प्लॅन्ट जवळील सेग्रीगेशन रुमची दुरुस्ती करणे. | रुपये १२,२७,४७१/- |
| (२) | उरण नगरपरिषदेचे बोरी उरण घनकचरा व्यवस्थापन करिता सेग्रीगेशन शेडची दुरुस्ती करणे. | रुपये ११,७७,८२५/- |
| (३) | उरण नगरपरिषद हद्दीतील भवरा पंप हाऊसची दुरुस्ती करणे. | रुपये ७,७८,८७१/- |
| (४) | उरण नगरपरिषदेचे हद्दीतील भवरा उरण येथील बदामवाडी पासून ते मुख्य रस्त्यापर्यंत नवीन आर.सी.सी. गटाराचे बांधकाम करणे. | रुपये २०,८३,५०९/- |
| (५) | उरण नगरपरिषदेचे हद्दीतील मोरा प्राथमिक शाळा क्र.३ ला नवीन कंपाऊंड वॉलचे बांधकाम करणे. | रुपये ७,३१,६४४/- |
| (६) | उरण नगरपरिषदेचे हद्दीतील वाणीआळी उरण येथील दादर नाल्याच्या भिंतीचे बांधकाम करणे. | रुपये ४,६१,५०५/- |
| (७) | उरण नगरपरिषदेचे हद्दीतील कुंभारवाडा उरण येथील दादर नाल्याच्या भिंतीचे बांधकाम करणे. | रुपये २०,३७,४११/- |

तरी अर्हता प्राप्त इच्छुक निविदाकारांनी दिनांक ३०-१-२०२५ ते ११-२-२०२५ या कालावधीत वरील संकेत स्थळावर रितसर निविदा अपलोड करावी.

जा.क्र. उनप/बांवि/६६१०/२०२४-२५
उरण नगरपरिषद, उरण, जि. रायगड.
दिनांक : २८/०१/२०२५

सही/-
मुख्याधिकारी,
उरण नगरपरिषद, उरण


### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे - कर्नाळा, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तिंच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीवे वर्णन येणेप्रमाणेः

**- मिळकतीचे वर्णन-**
**मौजे- कर्नाळा, ता-पनवेल, जि-रायगड**

| मौजे | भोगवटदाराचे नाव | गट क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रु.पै |
|---|---|---|---|---|---|
| कर्नाळा | श्री. नारायण विठू भोईर | १६१ | ५ | ०.१०.३० | ०.२२ |

सदरहू जागा, जमिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येणा-या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : ३०/ ०१/२०२५**

सही/-
**ॲड. सुरेखा र. सागावकर**
पत्ता- शॉप नं. ०३,०४, श्री हरेकृष्णा को. ऑप. सोसायटी, प्लॉट नं. १२, प्लॉट नं. ५, सेक्टर-५, नवीन पनवेल, ४१०२०६

### जाहीर नोटीस

**लातूर येथील मा. आर. बी. रोटे, मा. जिल्हा न्यायाधिश-१ तथा पदसिध्द सदस्य, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, लातूर, जिल्हा लातुर**

एम.ए.सी.पी. नं. २१२/२०२३
(इसा वि. जोहरअली व इतर ४)
प्रति. निशानी क्र.१७

2. Highway on Wheels Transport Pvt Ltd.
Through its Proprietor,
R/o. Panchand Panvel, Gala No.1, Pendhar Phata,
Raigarh-410208.
(Owner of Bulker Truck bearing Reg. No.MH-46-BM-5992)

सदर जाहीर नोटीसद्वारे आपणास कळविण्यात येते की, अर्जदार नामे **इसा पिता बाशामिया मुजावर, रा. आयशा कॉलनी, लातुर, ता. जि. लातुर** यांनी या न्यायालयात **एम.ए.सी.पी. नं. २१२/२०२३** मधील आदेशानुसार तुम्हांस बरेच वेळा या न्यायालया मार्फत नोटीस काढल्या असता, आपण बजावुन घेत नाहीत व घेण्यास टाळाटाळ करता म्हणुन अर्जदाराने वकीलामार्फत तुमच्या विरूध्द जाहीर नोटीस काढण्यासंबंधी अर्ज दाखल केला आहे. त्या अर्जावर मे. कोर्टाने आपल्या विरूध्द जाहीर नोटीस काढण्यासंबंधी अर्ज दाखल केला आहे. त्या अर्जावर मा. न्यायालयाने आपल्या विरुध्द जाहीर नोटीस काढण्यासंबंधी हुकुम केला आहे.

तुम्हांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, तुम्ही **दिनांक ०६.०२.२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता** जिल्हा न्यायाधीश-१ तथा पदसिध्द सदस्य मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, लातूर यांच्या न्यायालयात स्वतः अथवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे अन्यथा तुमच्या विरुध्द एकतर्फी आदेश करुन या प्रकरणाची सुनावणी होऊन निकाल देण्यात येईल.

आज दिनांक २४/०१/२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी देण्यात आले.

**सही/- (ए. एस. शिंदे) क. लिपीक, जिल्हा न्यायालय-१, लातूर** | कोर्ट शिक्का | **आदेशावरुन, सही/- (जी. एल. माने) सहाय्यक अधिक्षक जिल्हा न्यायालय, लातूर**

### जाहीर नोटीस

**लातूर येथील मा. आर. बी. रोटे, मा. जिल्हा न्यायाधिश-१ तथा पदसिध्द सदस्य, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, लातूर, जिल्हा लातुर**

एम.ए.सी.पी. नं. २०८/२०२३
(इकबाल व इतर १ वि. जोहरअली व इतर ४)
प्रति. निशानी क्र.२७

2. Highway on Wheels Transport Pvt Ltd.
Through its Proprietor,
R/o. Panchand Panvel, Gala No.1, Pendhar Phata,
Raigarh-410208.
(Owner of Bulker Truck bearing Reg. No.MH-46-BM-5992)

सदर जाहीर नोटीसद्वारे आपणास कळविण्यात येते की, अर्जदार नामे **इकबाल पिता रसुलसाब शेख व इतर १. रा. आनंदवाडी, ता. औसा, जि. लातुर** यांनी या न्यायालयात **एम.ए.सी.पी. नं. २०८/२०२३** मधील आदेशानुसार तुम्हांस बरेच वेळा या न्यायालया मार्फत नोटीस काढल्या असता, आपण बजावुन घेत नाहीत व घेण्यास टाळाटाळ करता म्हणुन अर्जदाराने वकीलामार्फत तुमच्या विरुध्द जाहीर नोटीस काढण्यासंबंधी अर्ज दाखल केला आहे. त्या अर्जावर मे. कोर्टाने आपल्या विरूध्द जाहीर नोटीस काढण्यासंबंधी अर्ज दाखल केला आहे, त्या अर्जावर मा. न्यायालयाने आपल्या विरुध्द जाहीर नोटीस काढण्यासंबंधी हुकुम केला आहे.

तुम्हांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, तुम्ही **दिनांक ०६.०२.२०२५** रोजी **सकाळी १०.३० वाजता** जिल्हा न्यायाधीश-१ तथा पदसिध्द सदस्य मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, लातूर यांच्या न्यायालयात स्वतः अथवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे अन्यथा तुमच्या विरुध्द एकतर्फी आदेश करुन या प्रकरणाची सुनावणी होऊन निकाल देण्यात येईल.

आज दिनांक २४/०१/२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी देण्यात आले.

**सही/- (ए. एस. शिंदे) क. लिपीक, जिल्हा न्यायालय-१, लातूर** | कोर्ट शिक्का | **आदेशावरुन, सही/- (जी. एल. माने) सहाय्यक अधिक्षक जिल्हा न्यायालय, लातूर**

### जाहीर नोटीस

**मा. निवासी नायब तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी याचे न्यायालय उरण, जि. रायगड**

चौकशी अर्ज क्र. ३०२/२०२५

श्री अंतोनी स्टीवन फर्नांडिस,
रा.घर नं. ११३२. ग्रॅन्डवेल नॉर्टन कंपनीच्या
बाजूला, मोरा,ता.उरण, जि. रायगड ............. अर्जदार

**विरुद**

मा. मुख्याधिकारी,
उरण नगरपरिषद उरण. ............ सामनेवाला
ता.उरण, जि. रायगड,

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार श्री. अंतोनी स्टीवन फर्नांडिस, यांनी उरण येथील मा. कार्यकारी दंडाधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार यांचे न्यायालयात त्यांची आजी कै. बेत्रीज अंतोनी फनॉडिस, व कै. मार्किस डिसोझा व कै. पेदाद मार्किस डिसोझा यांची मुलगी के. बेत्रीज अंतोनी फनॉडिस, यांच्या मृत्यूची नोंद उपलब्ध नसल्याने दिवस ठरवून मिळण्याकरीता अर्ज दाखल केलेला आहे. तरी दिनांक ०६/०४/१९९४ रोजी राहत्या घरी मौजे. मोरा उरण, ता.उरण येथे मृत्यू झालेला आहे तसेच त्यांचे दफन कार्य उरण चर्च येथे केलेले आहे असे अर्जात नमूद केलेले आहे. अर्जदार यांनी उक्त नोंद सामनेवाला यांच्या कार्यालयात होणेकरीता आदेश मिळणेकामी सदरचा अज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

तरी के. बेत्रीज अंतोनी फर्नांडिस, यांच्या मृत्यूच्या नोंदीबाबत कोणाचीही हरकत, घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून १५ दिवसाचे आत लेखी अथवा तोंडी हरकतो मा. न्यायालयाकडे योग्य त्या पुराव्यासह सादर कराव्यात.

याव्दारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती प्राप्त झाल्या नाहीत तर कै. बेत्रीज अंतोनी फर्नांडिस, यांच्या मृत्यूची नोंद सामनेवाला यांच्या कार्यालयास घेणेकामी त्यांना आदेश पारीत करणेत येतील. तदनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घेणेत यावी.
आज दिनांक २१/०१/२०२५ रोजी मे. कोर्टाच्या सही शिक्यानिशी देण्यात आली.

सही/-
**(महेश पाटील)**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार उरण**

### जाहीर नोटीस

**लातूर येथील मा. आर. बी. रोटे, मा. जिल्हा न्यायाधिश-१ तथा पदसिध्द सदस्य, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, लातूर, जिल्हा लातुर**

एम.ए.सी.पी. नं. २१३/२०२३
(गफार वि. जोहरअली व इतर ४)
प्रति. निशानी क्र.२६

2. Highway on Wheels Transport Pvt Ltd.
Through its Proprietor,
R/o. Panchand Panvel, Gala No.1, Pendhar Phata,
Raigarh-410208.
(Owner of Bulker Truck bearing Reg. No.MH-46-BM-5992)

सदर जाहीर नोटीसद्वारे आपणास कळविण्यात येते की, अर्जदार नामे **गफार पिता तुराबसाब शेख, रा. आनंदवाडी, ता. औसा, जि. लातुर** यांनी या न्यायालयात एम.ए.सी.पी. नं. २१३/२०२३ मधील आदेशानुसार तुम्हांस बरेच वेळा या न्यायालया मार्फत नोटीस काढल्या असता, आपण बजावुन घेत नाहीत व घेण्यास टाळाटाळ करता म्हणुन अर्जदाराने वकीलामार्फत तुमच्या विरुध्द जाहीर नोटीस काढण्यासंबंधी अर्ज दाखल केला आहे. त्या अर्जावर मे, कोर्टाने आपल्या विरुध्द जाहीर नोटीस काढण्यासंबंधी अर्ज दाखल केला आहे. त्या अर्जावर मा. न्यायालयाने आपल्या विरुध्द जाहीर नोटीस काढण्यासंबंधी हुकुम केला आहे.

तुम्हांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, तुम्ही **दिनांक ०६.०२.२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता** जिल्हा न्यायाधीश-१ तथा पदसिध्द सदस्य मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, लातूर यांच्या न्यायालयात स्वतः अथवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे अन्यथा तुमच्या विरुध्द एकतर्फी आदेश करुन या प्रकरणाची सुनावणी होऊन निकाल देण्यात येईल.

आज दिनांक २४/०१/२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी देण्यात आले.

**सही/- (ए. एस. शिंदे) क. लिपीक, जिल्हा न्यायालय-१, लातूर** | कोर्ट शिक्का | **आदेशावरुन, सही/- (जी. एल. माने) सहाय्यक अधिक्षक जिल्हा न्यायालय, लातूर**

### जाहीर नोटीस

**लातूर येथील मा. आर. बी. रोटे, मा. जिल्हा न्यायाधिश-१ तथा पदसिध्द सदस्य, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, लातूर, जिल्हा लातुर**

एम.ए.सी.पी. नं. २११/२०२३
(अब्दुल वि. जोहरअली व इतर ४)
प्रति. निशानी क्र.२७

2. Highway on Wheels Transport Pvt Ltd.
Through its Proprietor,
R/o. Panchand Panvel, Gala No.1, Pendhar Phata,
Raigarh-410208.
(Owner of Bulker Truck bearing Reg. No.MH-46-BM-5992)

सदर जाहीर नोटीसद्वारे आपणास कळविण्यात येते की, अर्जदार नामे **अब्दुल पिता तुराब शेख, रा. आनंदवाडी, ता. औसा, जि. लातूर** यांनी या न्यायालयात **एम.ए.सी.पी. नं. २११/२०२३** मधील आदेशानुसार तुम्हांस बरेच वेळा या न्यायालया मार्फत नोटीस काढल्या असता, आपण बजावुन घेत नाहीत व घेण्यास टाळाटाळ करता म्हणुन अर्जदाराने वकीलामार्फत तुमच्या विरुध्द जाहीर नोटीस काढण्यासंबंधी अर्ज दाखल केला आहे. त्या अर्जावर मे. कोर्टाने आपल्या विरुध्द जाहीर नोटीस काढण्यासंबंधी अर्ज दाखल केला आहे. त्या अर्जावर मा. न्यायालयाने आपल्या विरुध्द जाहीर नोटीस काढण्यासंबंधी हुकुम केला आहे.

तुम्हांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, तुम्ही **दिनांक ०६.०२.२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता** जिल्हा न्यायाधीश-१ तथा पदसिध्द सदस्य मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, लातूर यांच्या न्यायालयात स्वतः अथवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे अन्यथा तुमच्या विरुध्द एकतर्फी आदेश करुन या प्रकरणाची सुनावणी होऊन निकाल देण्यात येईल.

आज दिनांक २४/०१/२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी देण्यात आले.

**सही/- (ए. एस. शिंदे) क. लिपीक, जिल्हा न्यायालय-१, लातूर** | कोर्ट शिक्का | **आदेशावरुन, सही/- (जी. एल. माने) सहाय्यक अधिक्षक जिल्हा न्यायालय, लातूर**

### जाहीर नोटीस

**लातूर येथील मा. आर. बी. रोटे, मा. जिल्हा न्यायाधिश-१ तथा पदसिध्द सदस्य, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, लातूर, जिल्हा लातुर**

एम.ए.सी.पी. नं. २१४/२०२३
(शफिक वि. जोहरअली व इतर ४)
प्रति. निशानी क्र.२५

2. Highway on Wheels Transport Pvt Ltd.
Through its Proprietor,
R/o. Panchand Panvel, Gala No.1, Pendhar Phata,
Raigarh-410208.
(Owner of Bulker Truck bearing Reg. No.MH-46-BM-5992)

सदर जाहीर नोटीसद्वारे आपणास कळविण्यात येते की, अर्जदार नामे **शफीक पिता इसाक शेख, रा. हणमंतवाडी, ता. जि. लातुर** यांनी या न्यायालयात **एम.ए.सी.पी. नं. २१४/२०२३** मधील आदेशानुसार तुम्हांस बरेच वेळा या न्यायालया मार्फत नोटीस काढल्या असता, आपण बजावुन घेत नाहीत व घेण्यास टाळाटाळ करता म्हणुन अर्जदाराने वकीलामार्फत तुमच्या विरुध्द जाहीर नोटीस काढण्यासंबंधी अर्ज दाखल केला आहे. त्या अर्जावर मे कोर्टाने आपल्या विरुध्द जाहीर नोटीस काढण्यासंबंधी अर्ज दाखल केला आहे. त्या अर्जावर मा. न्यायालयाने आपल्या विरुध्द जाहीर नोटीस काढण्यासंबंधी हुकुम केला आहे.

तुम्हांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, तुम्ही **दिनांक ०६.०२.२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता** जिल्हा न्यायाधीश-१ तथा पदसिध्द सदस्य मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, लातूर यांच्या न्यायालयात स्वतः अथवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे अन्यथा तुमच्या विरुध्द एकतर्फी आदेश करुन या प्रकरणाची सुनावणी होऊन निकाल देण्यात येईल.

आज दिनांक २४/०१/२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी देण्यात आले.

**सही/- (ए. एस. शिंदे) क. लिपीक, जिल्हा न्यायालय-१, लातूर** | कोर्ट शिक्का | **आदेशावरुन, सही/- (जी. एल. माने) सहाय्यक अधिक्षक जिल्हा न्यायालय, लातूर**

### जाहीर नोटीस

**लातूर येथील मा. आर. बी. रोटे, मा. जिल्हा न्यायाधिश-१ तथा पदसिध्द सदस्य, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, लातूर, जिल्हा लातुर**

एम.ए.सी.पी. नं. २१०/२०२३
(जमीर वि. जोहरअली व इतर ४)
प्रति. निशानी क्र.२६

2. Highway on Wheels Transport Pvt Ltd.
Through its Proprietor,
R/o. Panchand Panvel, Gala No.1, Pendhar Phata,
Raigarh-410208.
(Owner of Bulker Truck bearing Reg. No.MH-46-BM-5992)

सदर जाहीर नोटीसद्वारे आपणास कळविण्यात येते की, अर्जदार नामे **जमीर पिता गफुर शेख, रा. चांडेश्वर, ता. जि. लातुर** यांनी या न्यायालयात **एम.ए.सी.पी. नं. २१०/२०२३** मधील आदेशानुसार तुम्हांस बरेच वेळा या न्यायालया मार्फत नोटीस काढल्या असता, आपण बजावुन घेत नाहीत व घेण्यास टाळाटाळ करता म्हणुन अर्जदाराने वकीलामार्फत तुमच्या विरुध्द जाहीर नोटीस काढण्यासंबंधी अर्ज दाखल केला आहे. त्या अर्जावर मे. कोर्टाने आपल्या विरुध्द जाहीर नोटीस काढण्यासंबंधी अर्ज दाखल केला आहे. त्या अर्जावर मा. न्यायालयाने आपल्या विरुध्द जाहीर नोटीस काढण्यासंबंधी हुकुम केला आहे.

तुम्हांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, तुम्ही **दिनांक ०६.०२.२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता** जिल्हा न्यायाधीश-१ तथा पदसिध्द सदस्य मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, लातूर यांच्या न्यायालयात स्वतः अथवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे अन्यथा तुमच्या विरुध्द एकतर्फी आदेश करुन या प्रकरणाची सुनावणी होऊन निकाल देण्यात येईल.

आज दिनांक २४/०१/२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी देण्यात आले.

**सही/- (ए. एस. शिंदे) क. लिपीक, जिल्हा न्यायालय-१, लातूर** | कोर्ट शिक्का | **आदेशावरुन, सही/- (जी. एल. माने) सहाय्यक अधिक्षक जिल्हा न्यायालय, लातूर**

## निवडक

### कल्याण मंडळातर्फे प्रजासत्ताक दिन

**पनवेल :** महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, वर्तक नगर, ठाणे केंद्राने मोठ्या उत्साहात अमृत महोत्सवी प्रजासत्ताक दिन साजरा केला. या वेळी प्रमुख पाहुणे राहुल चव्हाण, कार्मक्रमाचे अध्यक्ष गुणवंत कामगार व विशेष कार्यकारी अधिकारी अरविंद मोरे, विशेष उपस्थिती नताशा सोनकर, संध्या चौधरी, प्रवीण सकट उपस्थित होते. कार्यक्रमासाठी पुष्पा जामगावकर, केंद्र उप संचालिका, संदीप धुमाळे, केंद्र सेवक, मधुरा देशमुख, नताशा सोनकर, छाया वाळूज, वर्षा महाजन, दिपाली परदेशी, स्वाती जाधव, विजया पवार, उषा कारंडे, स्मिता चव्हाण यांनी परिश्रम घेतले.



### महिला मंडळातर्फे हळदीकुंकू



**उरण :** श्री महागणपती महिला मंडळ चिरनेर मुळपाडा यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही भारताच्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून हळदीकुंकू सोहळ्याचे आयोजन चिरनेरच्या प्रसिद्ध श्री महागणपती मंदिरात रविवारी २६ जानेवारीच्या प्रजासत्ताकदिनी सायंकाळच्या सुमारास करण्यात आले होते. सोहळ्यादरम्यान चिरनेर गावातील महिलांना सौभाग्याचे वाण लुटण्याची संधी मिळाली. प्रत्येक महिलेला तिळगुळ व हळदी कुंकवाचे वाण, तसेच आकर्षक भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

### गर्भसंस्कार शिबिर उत्साहात

**पनवेल :** २६ जानेवारी २०२५ रोजी डिएसआरफ ट्रस्ट द्वारा, नील हॉस्पिटल येथे गर्भसंस्कार शिबिर झाले. नील हॉस्पिटल येथे दर महिन्याला मोफत गर्भसंस्कार शिबीर कार्यक्रमास १४ वर्ष पुर्ण झाल्याबद्दल हा कार्यक्रम उत्साहात झाला. या वेळी डॉ.ज्योती दिघे वरिष्ठ स्त्रीरोगतज्ञ, डॉ नीता कामत वरिष्ठ बालरोग तज्ञ व इतर मान्यवर उपस्थित होते. स्त्रीरोग व गर्भ संस्कार तज्ञ डॉ.शुभदा नील यांनी गर्भवती महिलांना आहार, व्यायाम, प्राणायाम, मेडिटेशन, नॉर्मल डिलिव्हरी व इतर विषयांवर मोलाचे मार्गदर्शन केले.



# आळी आंबिवली येथील नवीन विद्युत ट्रान्सफार्मरचे काम मार्गी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा आळी आंबिवली येथील नवीन वसाहतीमध्ये कित्येक वर्षापासून विद्युत ट्रासफार्मर बंद अवस्थेत होता. त्याचे काम आमदार महेश बालदी यांच्यामुळे मार्गी लागले आहे.

या बंद असलेल्या विद्युत ट्रान्सफरमुळे एकाच ट्रान्सफरवर विद्युत भार पडत होता तसेच सुनील पवार घर ते मिलिंद कावडे यांच्या घरापर्यंत विद्युत वाहीण्यांचे दोन फेस असल्यामुळे विद्युत पुरवठा अपुरा होत होता. यामुळे वारंवार वीज खंडित होत होती.

आळी आंबिवली येथील ग्रामस्थ व स्थानिक नेते यांनी याबाबत महावितरण कंपनीस वारंवार विनंती अर्ज केले होते, परंतु याठिकाणी नवीन ट्रान्सफर बसवण्यात येत नव्हते अखेर भाजप शहराध्यक्ष चेतन जाधव व भाजप सहकारी कार्यकर्त्यांनी ही बाब आमदार महेश बालदी यांच्या कानावर घातली, त्याबाबत महावितरणाला निवेदन देण्यास आमदार महेश बालदी यांनी मोहोपाडा शहराध्यक्ष चेतन जाधव व कार्यकर्त्यास सांगितले.

आमदार महेश बालदी यांनी तत्काळ महावितरणाच्या भिंगारी येथील अधिकारी राठोड यांना दूरध्वनीवरून संपर्क साधला की, या ट्रान्सफर्मरचे काम मार्गी लावण्यात यावे.



काही दिवसातच मोहोपाडा महावितरणाचे उपअभियंता लक्ष्मीकांत गलांडे यांनी याठिकाणी भेट देऊन नवीन ट्रान्सफर बसवण्याचे काम हाती घेतले व ते पूर्ण पणे मार्गी लावले. याबाबत ग्रामस्थांनी आमदार महेश बालदी महावितरण व भाजप शहराध्यक्ष चेतन जाधव कार्यकर्ता यांचे आभार मानले.

**आळी आंबिवली येथील रखडलेले विद्युत ट्रान्सफार्मरचे काम मार्गी लागले असून विरोधक या कामाचे श्रेय घेत असून आमदार महेश बालदी यांच्या पाठपुरावाने काम पूर्ण झाले आहे, हे लक्षात घेणे गरजेचे आहे.**

–चेतन जाधव, भाजप मोहोपाडा, अध्यक्ष

# तळोजा येथे रस्ता सुरक्षाविषयक जनजागृती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वाढती अपघातांची संख्या लक्षात घेता, रस्ता सुरक्षा अभियान लोकचळवळीतून घरोघरी पोहोचवण्याचे कार्य परिवहन विभागातर्फे करण्यात येत असून, रस्ता सुरक्षा अभियान २०२५ ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरीता प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल यांच्या वतीने रस्ता सुरक्षा विषयक चित्रकला /रंगभरण स्पर्धाचे आयोजन तळोजा येथे करण्यात आले होते.

रस्ता सुरक्षा अभियान २०२५ ची अंमलबजावणी करण्यासाठी व जनजागृती करण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल तर्फे पनवेल कार्यालयाच्या परिक्षेत्रात १ जानेवारी २०२५ पासून, शाळा / महाविद्यालय, रिक्षा संघटना, सामाजिक संस्था, मोटर ट्रेनिंग स्कूल, वाहन वितरक यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा विषयक जनजागृती करण्याकरिता विविध उपक्रम राबवण्यात येत आहे.

या वेळी सर्व सहभागी विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा अभियानात सहभागी झाल्याबद्दल प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमास प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल तर्फे स्वप्निल नेवसे, आशिष जयसिंगपूरे, रोहित कोळप सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक, पनवेल व आरिफ शेख, वरिष्ठ लिपिक, प्रा.प.का. पनवेल यांनी उपस्थिताना रस्ता सुरक्षा विषय नियमांची माहिती, रस्ता सुरक्षा विषयक जनजागृती व प्रबोधनात्मक मार्गदर्शन केले.



# तळोजा कारागृहात जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

तळोजा मध्यवर्ती कारागृह येथील बंदीबांधवाकरिता व महानिरिक्षक कारागृह व जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अलिबाग रायगड यांच्यामार्फत बंद्यांकरिता गार्डनिंग व टु व्हिलर प्रशिक्षण वर्ग अमीता पवार सहाय्यक आयुक्त जिल्हा कौशल्य विकास व रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र अलिबाग ,विकास चव्हाण, संस्थापक, प्रगती स्किल डेव्हलपमेंट सेंटर, पनवेल यांचे स्वागत कारागृह अधिक्षक प्रमोद वाघ यांनी केले.

या वेळी प्रशिक्षणासंदर्भात माहिती विकास चव्हाण, प्रगती स्किल डेव्हलपमेंट सेंटर, पनवेलचे संस्थापक यांनी बंद्यांना कौशल्य आधारीत प्रशिक्षण उपलब्ध करून रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही प्रगती स्किल डेव्हलपमेंट सेंटरमार्फत करण्यात येईल असे सांगितले.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुण्या अमिता पवार मॅडम यांनी या प्रशिक्षणाचा लाभ बंद्यांना मिळावा म्हणून ऑफलाईन प्रशिक्षण देण्याची परवानगी मिळणेबाबत प्रस्ताव सादर केला असता जिल्हाधिकारी साहेबांनी तात्काळ मान्यता दिल्याने प्रशिक्षण वर्ग सुरु झाले आहेत.

या कार्यक्रमाचे आभार कारागृहाचे



अतिदक्षता अधीक्षक गोविंद राठोड यांनी कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे अमिता पवार मॅडम यांनी या कारागृहात कौशल्य आधारीत प्रशिक्षण वर्ग सुरू करण्याबाबत केलेल्या प्रयत्नाचे विशेष आभार मानले. तसेच प्रगती स्कील डेव्हलपमेंट सेटर पनवेलचे विकास चव्हाण यांचेही आभार मानले व उत्तम प्रशिक्षण देण्यासाठी उत्तम प्रशिक्षक उपलब्ध करुन देण्याबाबत सूचीत करून उपस्थिताचे आभार मानले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शिक्षक एन. आर. शिंदे यांनी केले.

गार्डनिंग कम नर्सरी याचे प्रशिक्षण सोमवार दि.२७/०१/२०२५ पासून सुरु करण्यात आले. प्रशिक्षण चालू होण्याकरिता कारागृह अधीक्षक प्रमोद वाघ, कारागृहाचे अतिरिक्त अधीक्षक गोविंद राठोड, कारागृह उपअधिक्षक महादेव पवार या वेळी अंतर्गत सुरक्षा अधिकारी राहुल झुटाळे, वरिष्ठ तुरुंगाधिकारी (प्रशासन) सुनिल पाटील, शिक्षक एम. अधिकारी जी.व्ही. तागड यांनी विशेष प्रयत्न केले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचे उडान फेस्टिवलमध्ये यश



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाने मंगळवारी (दि.२८) मुंबई विद्यापीठाने पिल्लई महाविद्यालयात आयोजित केलेल्या उडान फेस्टिवलमध्ये पथनाट्य स्पर्धेत तिसरा क्रमांक पटकाविला आहे.

या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील विद्यार्थ्यांनी मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या पथनाट्य स्पर्धेमध्ये भाग घेऊन त्यांच्या सादरीकरण कौशल्याने तिसरा क्रमांक पटकाविला. या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी खूप मेहनत घेऊन हे यश खेचून आणले आहे. सुजल रोहीलकर अकाउंट व फायनान्स विभागातील विद्यार्थ्याने लीडर म्हणून काम केले तसेच त्याचे इतर मित्र व मैत्रिणींनी त्याला साथ दिली. प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धांसाठी प्रा. महेश धायगुडे तसेच प्रा.योगिता पाटील तसेच अध्ययन अध्यापन व विस्तार विभागातील इतर सर्व सदस्यांचे विद्यार्थ्यांना या स्पर्धे साठी मार्गदर्शन व सहकार्य मिळाले.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, परेश ठाकूर कार्यकारी संचालक जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था व संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे सर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.




**पनवेल : दीपक फर्टीलायझर एम्प्लॉज युनियनमध्ये उपाध्यक्ष पदासाठी विनायक मुंबईकर यांची भरघोस मताने निवड झाली. याबद्दल त्यांचा आमदार प्रशांत ठाकूर व भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर आदी उपस्थित होते.**



**उलवे : प्रजासत्ताक दिनानिमित्त सेक्टर १७ ब्रोकर असोसिएशन यांच्या वतीने आयोजित झेंडावंदन वहाळचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे यांच्या हस्ते झाले. या वेळी ॲड. सुनील कुमार मौर्य, महेश नाईक, उदय पांडे, कोषाध्यक्ष अमित नाईक, अवधेश महतो, उदय पांडे प्रल्हाद सगर आणि जवळजवळ २०० ब्रोकर कमिटी व वरीष्ठ नागरिक, महिला उपस्थित होत्या.**

# नवीन पनवेलमध्ये समुदेशन केंद्राचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत विकास परिषद या संस्थेच्या वतीने 'समुपदेशन केंद्र' या कायमस्वरूपी प्रकल्पाचा उद्घाटन सोहळा झाला. 'आस्था एक आधारस्तंभ' या नावाने नवीन पनवेल सेक्टर १८ येथील डॉ. कीर्ती समुद्र यांच्या क्लिनिकमध्ये हे केंद्र सुरू करण्यात आले.

मानसोपचारतज्ज्ञ डॉ. प्रदीप पाटकर यांच्या हस्ते या केंद्राचे उद्घाटन झाले. चित्रा पाटकर, मानसोपचारतज्ज्ञ डॉ. ओंकार माटे, डॉ. आरोही माटे डॉ. रविंद्र ईनामदार, स्त्रीरोगतज्ज्ञ माधूरी



ईनामदार, सुनिल लघाटे, हेमंत चौधरी तसेच के.व्ही.के. बिल्डर्सचे प्रशांत ठाकूर, पनवेलमधील अनुभवी डॉक्टर्स आदी उपस्थित होते.

सचिव पद्मजा कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. मानसोपचारतज्ज्ञ डॉ. प्रदीप पाटकर आणि डॉ. ओंकार माटे यांनीही मार्गदर्शन केले. उपक्रम निःशुल्क असून लाभ घेण्याचे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. संपर्कासाठी ८०९७१३५६५६ हा क्रमांक आहे.



**पनवेल : कोंडले गावामध्ये हळदीकुंकू समारंभ आयोजित करण्यात आला होता. या वेळी खैरवाडी ग्रामपंचायतीचे सरपंच भाग्यश्री कोलंबेकर, अंगणवाडी सेविका मोनिका पाटील, योगिता पाटील, माजी सरपंच संगीता शिंदे, आशा वर्कर माधुरी पाटील, अपिता खंडागळे, सुप्रिया कोंळबेकर आणि गावातील महिला मंडळ आदी उपस्थित होते.**

## क्लिक...क्लिक...!



**माणगाव : माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयात प्रजासत्ताक दिनी विद्यार्थ्यांनी बहारदार नृत्य सादर केले.** (छाया : सलीम शेख)

# प्रजासत्ताक दिनानिमित्त रोहित्र, उपकेंद्र आणि कार्यालयांची सफाई

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

भांडुप परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनिल काकडे यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त परिमंडलातील रोहित्र (डीपी), उपकेंद्र आणि कार्यालयांची स्वच्छता करण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत १८९८ कर्मचारी, अभियंते व अधिकाऱ्यांनी परिमंडलातील २२१२ रोहित्र, १३३ उपकेंद्र आणि २६५ कार्यालयांची साफसफाई केली.

मोहिमेत मुख्य अभियंता सुनिल काकडे यांच्यासह कार्यकारी अभियंता श्रीनिवास चटलावार, सहाय्यक महाव्यवस्थापक प्रवीण रहांगदळे, नमिता गझदर, उपमुख्य



औद्योगिक संबंध अधिकारी महेंद्र बागुल यांच्यसासह ३५ जणांनी साफसफाई केली. तर ठाणे मंडल कार्यालयांतर्गत भांडुप, मुलूंड, ठाणे शहर एक आणि दोन, वागळे इस्टेट विभागात ४५१ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी १३८७ रोहित्र, ४७ उपकेंद्र आणि ६१ कार्यालयांची स्वच्छता केली. वाशी मंडल कार्यालयातील नेरुळ, वाशी आणि पनवेल शहर विभागात ५५१ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी १०८ रोहित्र, ४८ उपकेंद्र आणि ५५ कार्यालयांमध्ये साफसफाई केली. पेण मंडल कार्यालयांतर्गत अलिबाग, गोरेगाव, रोहा व पनवेल ग्रामीण विभागातील ८६१ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ७१५ रोहित्र, ३७ उपकेंद्र आणि १४८ कार्यालयांमध्ये स्वच्छता केली.

अधीक्षक अभियंते राजाराम माने, संजय पाटील व युवराज मेश्राम यांच्या नेतृत्वाखाली ही कामगिरी करण्यात आली.

# रायगडचा हापूस खातोय मुंबईच्या बाजारात भाव

**पाली,अलिबाग : प्रतिनिधी**

कोकणच्या हापूस आंब्याचा रंग, सुगंध आणि अविट गोडी आणि चवीची भुरळ संपूर्ण जगातील खवय्यांना आहे. रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील नारंगी गावचे आंबा बागायतदार वरुण पाटील यांच्या रोहा वर्हाटी येथील बागायती मधील पहिला हापूस आणि केशर जातीच्या आंब्याच्या पहिल्या पेट्या मुंबई बाजारात मंगळवारी दाखल झाल्या आहेत.

हापूसच्या ४ पेट्या आणि केशर जातीच्या १ पेटी वाशी बाजारात मंगळवारी दाखल झाल्या असून रायगडचा हापूस आता बाजारात भाव खाणार आहे. डझनाला पाच हजार रुपये दर मिळेल अशी माहिती आंबा बागायतदार वरुण पाटील यांनी दिली आहे. दरवर्षी प्रमाणे यंदाही रायगडाच्या हापूस आंब्याची पेटी बाजारात नेणारे वरुण पाटील हे पहिले मानकरी ठरले आहेत. बागायती मधून काढलेल्या आंब्याची कुटुंबाने मनोभावे पूजा करून आंबा पेट्या बाजारात रवाना केल्या आहेत.

रायगड जिल्ह्यात देखील हापूस आंब्याचे पीक मोठ्या प्रमाणावर येते. अलिबाग, रोहा, पेण, श्रीवर्धन, म्हसळा आदी तालुक्यात हापूस आंब्याचे पीक चांगले मिळते. रायगडच्या हापूस आंब्याची गुणवत्ता व चव अप्रतिम असल्याने येथील आंब्याला बाजारात मोठी मागणी आहे.

तरुण आंबा बागायतदार वरुण पाटील हे बाजारात आंब्याची पहिली पेटी नेण्यात अग्रगण्य ठरले आहेत. तब्बल ४५ एकर जागेवर त्यांनी आंबा बागायत केली असून वर्षभर केलेल्या मेहनतीचे गोड फळ त्यांना जानेवारी पासून मिळायला सुरवात होते. दरवर्षी आपल्या बागेतून किमान ४० हजार डझन आंबे ते बाजारात नेतात, यावर्षीची पहिली आंबा पेटी बाजारात नेण्याचा बहुमान पुन्हा वरुण पाटील यांना मिळाला आहे.

यंदा पाऊस उशिरा पर्यंत होता तरीदेखील जानेवारी मध्ये उत्पादन मिळाले, यामागे खत व्यवस्थापन,कीड व्यवस्थापन योग्यरीत्या केल्याने ते शक्य झालं आहे. बाजारात परराज्यातील आंबा हापूसच्या नावाने विकला जातो,यामध्ये ग्राहकांची फसवणूक होते, त्यामुळे खात्रीशीर विक्रेत्या कडून आंबे घेणे , अथवा मानांकन तपासूनच आंबे खरेदी करणे ही पद्धती अवलंबून व्यवहार करणे हिताचे ठरेल असे वरुण पाटील म्हणाले.

कोकणातील हापूस आंब्याचा सुगंध विशिष्ट असतो, तर इतर आंब्याच्या तुलनेत हापूस चा गोडवा अधिक असतो. हवामानातील बदल व बदलत्या वातावरणात ही जानेवारी महिन्यात आंबा पेटी बाजारात पाठवणे ही मोठी गोष्ट आहे, मला माझे कुटुंब, हितचिंतक यांचे सहकार्य मिळाले



## माणगाव रिक्षा संघटनेतर्फे जीवनदूत पुरस्कार्थींचा सत्कार



**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा पोलीस दल आयोजित रस्ता सुरक्षा अभियान २०२५ कार्यक्रमांतर्गत पोलीस दलातर्फे विविध कठीण प्रसंगी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून पोलिसांना विशेष सहकार्य करणाऱ्या जीवनदूतांचा जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले होते .त्यांचा माणगाव रिक्षा संघटनेतर्फे मंगळवार ( दि, २८ ) रोजी सत्कार करण्यात आला.

माणगावमधील रिक्षा संघटनेचे नविन एसटी स्टॅन्डचे उपाध्यक्ष जमाल पिलपिले,रुग्णवाहिका चालक संदेश घर्वे,माणगाव उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन कामी दिवसरात्र काम करणारा भगवान पवार यांचा यामध्ये समावेश होता. या तिघांचा रिक्षा चालक – मालक संघटनेतर्फे श्री सत्यनारायणाची महापूजेचे औचित्य साधून नवीन बस स्थानका वरील रिक्षा स्टॅन्डवर उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी,पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे,वाहतूक शाखेच्या सहाय्यक निरीक्षक मीरा लाड यांच्या हस्ते व संघटनेचे तालुकाध्यक्ष संजयअण्णा साबळे,डॉ.मोहन दोशी,उल्हास गोडसे यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

या सत्कार कार्यक्रमात मार्गदर्शन करताना पुष्कराज सूर्यवंशी म्हणाले कि,रिक्षा चालक – मालक हे रिक्षाच्या माध्यमातून जनतेला सेवा देत असतात. ते कोणताही स्वार्थ न ठेवता विविध घटना,प्रसंग घडल्यास पोलीस दलाला सहकार्य करीत असतात. सणासुदीमध्ये वाहतूक व्यवस्था सुरळीत सुरु राहण्यासाठी ते पोलिसांना मदत करतात. या रिक्षाचालकांचे नेतृत्व संजय साबळे करीत असून ते वाखाण्याजोगे असल्याचे सांगुन सत्कार झालेल्या रिक्षा चालक मालकांचे अभिनंदन केले.

पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांनी ,आण्णा वाढत्या वयातही रिक्षा संघटनेचे नेतृत्व करतात याचे कौतुक करुन माणगाव रिक्षा संघटनेचे नेहमीच पोलीस दलाला चांगले सहकार्य राहिले असल्याने आभार व्यक्त केले या कार्यक्रमास रिक्षा संघटनेचे सल्लागार हुसेनभाई आकुस, नरेश सावंत, पांडुरंग गुजर,विभागीय अध्यक्ष नामदेव खराडे,लियाकत रहाटविलकर,सचिव प्रशांत खरे,खजिनदार निलेश आडीत,माजी अध्यक्ष पराग सावंत,संतोष सावंत,राजेश बक्कम,सुनील भोनकर,विजय पवार,सुनील दासगावकर,दिनेश मुंढे,अजिंक्य खाडे,युसूफ शेख उपस्थित होते.

## माथेरान मधील महिलांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**माथेरान: बातमीदार**

माथेरान मधील विविध समस्यांबाबत येथील महिलांनी मग़ळवारी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले आहे. यामध्ये ई–रिक्षांची संख्या त्वरित वाढविणे तसेच ई–रिक्षा सेवा चोवीस तास सुरू ठेवणे,क्ले–पेव्हर ब्लॉक च्या रस्त्यांची कामे पुन्हा सुरू करणे आणि सनियंत्रण समितीमध्ये स्थानिक व्यक्तीची नेमणूक करणे अश्या समस्यांचे गाऱ्हाणे रायगड जिल्हाधिकारी यांच्या कडे निवेदनाद्वारे देण्यात आले आहे.



माथेरान मधील महिलांनी आक्रमक पवित्रा घेत सर्व सामान्यांना भेडसावणाऱ्या समस्यांबाबत रायगड जिल्हाधिकारी यांची मंगळवार (दि.२८ ) रोजी दोनशेपेक्षा जास्त महिलांनी सही केलेले निवेदन घेऊन अलिबाग येथे जिल्हाधिकार्यांची भेट घेण्यास गेल्या तेथे निवासी उपजिल्हाधिकारी यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देण्यात आले.या निवेदनात येथील विविध समस्या नमूद करण्यात आल्या होत्या.ई–रिक्षा पायलेट प्रकल्प यशस्वी पणे पूर्ण झाला.मात्र उर्वरित ७४ हातरीक्षा चालकांना ई–रिक्षा मिळाल्या नाहीत.तर ई–रिक्षा सुरू झाल्यामुळे माथेरान पर्यटनस्थळी मोठ्या प्रमाणावर पर्यटक वाढत आहेत.त्यामुळे उर्वरित ७४ हातरीक्षा चालकांना सुद्धा आता ई–रिक्षा मिळाल्या पाहिजेत.तसेच ई–रिक्षांची वाढती मागणी पाहता येथे माथेरान पर्यटनस्थळी ई–रिक्षा सेवा चोवीस तास सुरू ठेवावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

ई–रिक्षा संदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सनियंत्रण समितीची स्थापना करण्यात आली आहे.या सनियंत्रण समितीमध्ये स्थानिक व्यक्तीची नेमुणूक येथे करण्यात यावी.तसेच येथील मुख्य महात्मा गांधी रस्ता येथे क्ले–पेव्हर ब्लॉकचे काम लवकरात लवकर सुरू करावे.अश्या विविध समस्यांबाबत माथेरान महिलांनी एकत्रित येऊन निवासी उपजिल्हाधिकारी अलिबाग यांना निवेदन देण्यात आले आहे.यावेळी वर्षा शिंदे,सुहासिनी दाभेकर,रिजवाना शेख,अर्चना बिरामणे,सुजाता जाधव,कल्पना पाटील उपस्थित होत्या.

## मोरे महिला महाविद्यालयाच्या एनएनएसचे श्रमसंस्कार शिविर

**रोहे : प्रतिनिधी**

एम.बी.मोरे फाउंडेशन कला वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय धाटाव राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत ‘स्वच्छ भारत अभियान आधारित सात दिवशीय श्रमसंस्कार शिबिर’ २१ ते२७ जानेवारी पर्यंत आयोजित करण्यात आले होते.



शिबिरामध्ये महाविद्यालयाच्या ग्रंथपाल प्रा.निर्मला थोरात यांनी शिबिरातील विद्यार्थिनींना आजच्या काळात योगाचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले त्यानंतर अंशुल कंपनीचे मालक अश्विन भाई श्रॉफ यांच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त शिबिरातील स्वयंसेविकांना घरगुती केक मेकिंग बनवण्याचे मार्गदर्शन व प्रात्यक्षिक रोहिणी गोसावी यांनी दिले. विद्यार्थिनींचा सर्वांगीण विकास व्हावा हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून व्यक्तिमत्व विकास या विषयावर किशोर शिताले, सिद्धेश रघुवीर , दर्पण जाधव यांनी मार्गदर्शन करून स्वयंसेविकांची हास्य कर्मणुकीचे खेळ घेतले.

शिबिरामध्ये रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन टीममार्फत उद्भवणाऱ्या नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तीवर मात करण्यासाठी उपाय योजनाचे प्रशिक्षण दिले आपत्तीचे प्रकार त्यांचे दुष्परिणाम तसेच वापरण्यात येणारी साधने याची माहिती देऊन संकट काळात जखमी पिडीत आणि सुरक्षित स्थळे हलविणे आणि त्यावर केलेला औषध उपचार याबाबत मार्गदर्शन सागर दहिंबेकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या प्रा. दिपाली वारंगे यांनी महिलांच्या आरोग्यबाबत समस्या तर प्रा. दर्शना शिंदे यांनी मानवी भूगोल या विषयावर प्रा.माधुरी जाधव यांनी बौद्धिक मालमत्ता हक्क , प्रा. प्रतिमा भोईर यांनी करियर मार्गदर्शन विषयावर विद्यार्थिनींशी संवाद साधला.

रायगड जिल्हा समन्वयक प्रा तुळशीदास मोकळ व एस. डी. पाटील यांनी शिबिरामध्ये भेट देऊन तेथील स्वयंसेविकांना व्यक्तिमत्व विकास यावर मार्गदर्शन केले. स्वयंसेवीकांशी (विद्यार्थिनींशी) शिबिरामध्ये संवाद साधला प्रा. नरेश घाग यांनी अर्थशास्त्र –विद्याप्राप्ती यावर मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत रोठ – बुद्रुक येथे स्नेहसंमेलन सांस्कृतिक सोहळा आयोजित करण्यात आले होते.

या शिबिराचा निरोप समारंभ प्रसंगी संस्थेचे संचालक अशोकराव मोरे, श्री उत्तमराव मोरे, रोठ ग्रुप ग्रामपंचायत सरपंच नितीन वारंगे, सदस्य अमित घाग, मंगेश देवकर रोठ बुद्रुक ग्रामसेविका अलका बामगुडे, महाविद्यालयीन प्रा. योगिता बराटे उपस्थितीत होतें. शिबिरामध्ये विद्यार्थिनींनी सात दिवसाचा अनुभव यावर चर्चा केली त्यांनतर अमित घाग, सरपंच नितिन वारंगे, संस्थेचे संचालक अशोक मोरे यांनी विद्यार्थिनींना मोलाचे मार्गदर्शन केले.

या शिबिरामध्ये विद्यार्थिनी मधून एक बेस्ट ग्रुप म्हणुन ‘अवचितगड’ निवडण्यात आला. बेस्ट ऑफ राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेविका म्हणुन प्राची रटाटेची निवड करण्यात आली.

## न्यायालयीन कामकाजामध्ये मराठी भाषेचा जास्त वापर व्हावा – राजंदेकर

**अलिबाग : प्रतिनिधी**

न्यायालयीन कामकाजामध्ये जास्तीत जास्त मराठी भाषेचा वापर करावा अशी अपेक्षा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. एस. राजंदेकर यांनी व्यक्त केली.

जिल्हा न्यायालयात जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि जिल्हा न्यायालय यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा कार्यक्रम अंतर्गत मराठी भाषेचा न्यायालयीन कामकाजात मराठी भाषेचा वापर या विषयावर ॲड श्रीराम ठोसर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

यावेळी जिल्हा न्यायाधीश एन.के. मणेर, भगत, ॲड श्रीराम ठोसर, रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव तथा वरिष्ठ न्यायाधीश अमोल शिंदे आदी उपस्थित होते. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. एस. राजंदेकर यांच्या हस्ते ॲड श्रीराम ठोसर यांचे स्वागत करण्यात आले .

ॲड श्रीराम ठोसर यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना दुर्दैवाने शहराकडे मराठी भाषा लयास जाताना दिसत आहे. त्यासाठी मराठी भाषा जोपासणे व तिचे संवर्धन करणे हे गरजेचे आहे इतर भाषा शिकताना आपण मराठीकडे दुर्लक्ष करतो. सर्व न्यायाधीश आणि वकिलांनी न्यायालयात मराठीचा जास्त वापर करावा असे सांगितले.

यावेळी जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. एस. राजंदेकर यांनी मराठी भाषा खूप समृद्ध आहे. उच्चारांवर वाक्याचा अर्थ बदलतो, पण आपल्याकडे तीचा योग्य वापर होत नाही अशी खंत यावेळी व्यक्त केली.



## प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून आंबेपुर एसटी निवारा शेडचे लोकार्पण



**रेवदंडा: प्रतिनिधी**

उसर गेल इंडिया कंपनीने वरंडे ग्रा.प. अंतर्गत आंबेपुर येथील अलिबाग–वावे या मुख्यः रस्तावर प्रजासत्ताक दिनाचे औचित्याने प्रवासीवर्गाच्या सुविधेसाठी नव्याने उभारण्यात आलेल्या एस.टी.बस थांबाचे लोकार्पण सोहळा उत्साहात संपन्न झाला.

अलिबाग तालुक्यातील उसर येथील गेल इंडिया लि. कंपनीच्या नवीन पीडीएच–पीपी प्रकल्पाचे बांधकाम जोरात सुरू आहे. या पीडीएच–पी पी प्रकल्पातून तयार होणारे मुख्या उत्पादन पॉजी प्रॉपिलीन जोरात असून या प्रकल्पासाठी अंदाजे अकरा हजार दोनशे पन्नास कोटी रूपयांची गुंतवणूक होणार आहे. या प्रकल्पाने आसपासच्या गावाचा सामाजीक व आर्थिक विकास होत आहे. गेल इंडिया लि. ही उसर, बेलोशी,खानाव, चिंचोटी, वरंडे, बामणगाव, आणि कावीर, या ग्रामपंचायतीच्या आसपास येत असल्याने गेल कंपनीने नियमित पर्यावरण दायित्व–सिईआर चे अंतर्गत आसपासच्या गावांच्या विकासासाठी एकूण ७.८५ कोटी निधीची मान्यता दिली आहे. ही विकास कामे जिल्हाधिकारी रायगड यांचे निर्देशानुसार आसपासचे ग्रामपंचायतीच्या माध्यमातून राबविण्यात येत आहेत.

त्यामध्ये संबधीत गावातील ग्रामस्थांसाठी पिणचे पाण्यासाठी आरओ प्लांट ची व्यवस्था, सौर पथदिवे, शाळा अंगणवाडयाचे सुशोभिकरण आण्यिझा डिजीटलायझेशन, तालवाचे बांधकाम, बसस्टॉपचे बांधकाम, उंच प्रकाश स्तंभ, असलेली लाईट, ग्रामपंचायत अंतर्गत विविध गावामध्ये पायाभुत सुविधा सुधारणा इत्यादी कामे हाती घेण्यात आली आहेत, त्यामुळे आसपासच्या गावांच्या परिसराचा विकास होत आहे अशी माहिती महाप्रबंधक वरिष्ठ अधिकारी जितिन सक्सेना यांनी यावेळी दिली.

प्रजासत्ताक दिनाचे औचित्याने आंबेपुर येथील नुतन एस.टी.बस थांबाचा शुभारंभ व लोकार्पण सोहळा उसर गेल इंडिया लि. कंपनीचे मुख्य महाप्रबंधक तथा प्रभारी अधिकारी अनुप गुप्ता, महाप्रबंधक वरिष्ठ अधिकारी जितिन सक्सेना, जनसंपर्क अधिकारी मिलिंद म्हात्रे, यांचे उपस्थितीत संपन्न झाला. तसेच ग्रुप ग्रामपंचायत बेलोशी अंतर्गत मल्याण व दिवीपारंगी येथे जलशुध्दीकरण प्रकल्पाचा लोकार्पण करण्यात कार्यक्रम घेण्यात आला. ग्रामपंचायत बेलोशी अंतर्गत मल्याण, परळवाडी, बेलोशी, सागवाडी, दिवीवाड, पाटवाडी, वळवलीवाडी,मठवाडी, व वळवली, येथे आर.ओ.प्लांट कार्यान्वित करण्यात आले.

### जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

खाली सविस्तर नमूद केलेल्या मौजे–पारगाव डुंगी, ता. पनवेल, जि. रायगड येथील शेतीच्या मिळकतीचे बदल्यात २२.५% योजनेअंतर्गत मिळणारा भूखंड आमचे अशिलांनी सदरहू भूखंडाचे मालक श्रीम. मंजुळा कृष्णा नाईक, श्री. बाळाराम कृष्णा नाईक, श्री. भरत कृष्णा नाईक, श्री. पद्माकर कृष्णा नाईक, श्री. अनिल उर्फ अण्णा कृष्णा नाईक, श्रीम. हिराबाई राम नाईक, श्री. पंकज राम नाईक, श्री अजय राम नाईक यांचेकडून मे. सिडको महामंडळाच्या पूर्वपरवानगीने त्रिपक्षीय करारान्वये खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू भुखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मौजे–पुष्पक नगर, ता. पनवेल, जि. रायगड**

| नोड | प्लॉट नं. | सेक्टर नं. | क्षेत्र चौ. मी. |
|---|---|---|---|
| मौजे–पुष्पक नगर | २०४ | ३ | २०० चौ.मी. |

वरील भुखंडाच्या मिळकतीवर कोणाचा, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, एम.ओ.यू., साठेकरार, वचन चिठठी, बयाणा पावती, विकास करार, विक्री–करार, मृत्यूपत्र, गहाण, दान, बक्षिस, लीज, लिन, पोटगी हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या लेखी हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **१४ (चौदा)** दिवसांचे आंत योग्य त्या सकृतदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास सदरहू भुखंडाची मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशील सदर भूखंडच्या मिळकतीचे खरेदी–विक्रीच्या अनुषंगाने हस्तारणाचा त्रिपक्षीय करार व अन्य व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व त्या आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, कृपया यांची नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक –३०/०१/२०२७**

**सही/–**
**ॲड. श्री. स्वप्नेश संजय घरत**
**ऑफिस : ००१, पहिला मजला,**
**ए–विंग, यशोकिरण को. ऑप, हौ. सोसायटी,**
**सावरकर चौक, पनवेल–४१०२०६**
**ता. पनवेल, जि. रायगड.**
**मोबाईल क्र.८३६९४९४३४१/९६९९०३६४३२**

# पेण खारेपाटात घुमणार कबड्डीचा आवाज

## वाशी येथे ७ ते ९ फेब्रुवारीला जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धा

**पेण : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धेचा थरार छत्रपती संभाजी महाराज मैदान वाशी वढाव रोड येथे ७,८ व ९ फेब्रुवारीला घुमणार असून या स्पर्धेची जय्यत तयारी करण्यात येत आहे. रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने जयभवानी वाशी, वरसुआई वाशी व वैकुंठदादा पाटील मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन छत्रपती संभाजी महाराज मैदान वाशी वढाव रोड येथे ७ ते ९ फेब्रुवारी या दरम्यान करण्यात आले आहे. त्याबाबत नियोजन व माहिती देण्यासाठी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनचे मा.कार्यवाह आस्वाद पाटील, युवा नेते वैकुंठ पाटील, भाजप सरचिटणीस मिलिंद पाटील, शरद कदम, परशुराम म्हात्रे, जगदिश पाटील, सुर्यकांत ठाकूर, निलेश पाटील, पद्माकर पाटील, संजय मोकल आदींसह आयोजक होते.



या स्पर्धेत १९८ पुरुष संघ व ३२ महिला संघाचा समावेश असणार आहे. ५० पंचांच्या देखरेखीखाली या स्पर्धा होणार आहेत. एकूण ६ क्रीडांगण करण्यात आली असून ५००० ते १०००० प्रेक्षक क्षमता अपेक्षित धरून गॅलरीसह व्यवस्था करण्यात येणार आहे. व्हीआयपी व इतर वाहनांसाठी ३ गेट असून पार्किंग व्यवस्था उत्तम प्रकारे करण्यात येणार आहे. या स्पर्धेच्या आयोजनाबाबतची माहती आस्वाद (पप्पूशेठ) पत्रकार परिषदेत दिली.

पेणमधील पेण फेस्टिव्हल मध्ये पाटणेश्वर आणि वाशी संघात जो चुरशीचा सामना झाला. ही लढत अतिशय प्रेक्षणीय ठरली या वेळी पेणमध्ये कबड्डी स्पर्धा भरविण्याचा विचार मनात आला व त्या दिवसापासून तयारीला लागलो आणि लवकरच सर्वांच्या सहकार्याने हि स्पर्धा येथे होणार असल्याची माहिती या वेळी युवा नेते वैकुंठ पाटील यांनी दिली.

या स्पर्धेदरम्यान राज्यसभेचे खासदार धैर्यशील पाटील, लोकसभा खासदार सुनील तटकरे, मंत्री रविंद्र चव्हाण, आमदार रविशेठ पाटील, महिला बालविकास मंत्री आदीती तटकरे, मंत्री भरत गोगावले, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेंद्र दळवी, माजी आमदार जयंत पाटील, चित्रा पाटील, चित्रा वाघ व इतर मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती वैकुंठ पाटील यांनी दिली. यापूर्वी विजेत्या व उपविजेत्या संघांना फिरता चषक देण्यात येत होता.

यावर्षी आणखी एक एक चषक देण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली तसेच जिल्ह्यातील छत्रपती पुरस्कार विजेते आजी माजी खेळाडू यांचादेखील या वेळी सन्मान करण्यात येणार असल्याचे या वेळी भाजप जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील यांनी सांगितले.

# माथेरानच्या जॉकी संदेशची अश्वशर्यतीत विजयी स्वारी

**माथेरान : प्रतिनिधी**

अश्वशर्यतीच्या विश्वात मानाची समजली जाणारी डर्बी रेस जिंकून माथेरानचा सुप्रसिद्ध जॉकी संदेश आखाडे याने आपल्या कर्तृत्वाची पताका पुन्हा एकदा बंगळुरू च्या रेसकोर्सवर फडकावली असून माथेरान शिरपेचात अजून एक मानाचा तुरा रोवला आहे.



थंड हवेचे जगप्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या माथेरान शहराचे घोडेस्वारी हेदेखील एक विशेष आकर्षण आहे. अश्वशर्यतीच्या विश्वात आंतरराष्ट्रीय ख्याती मिळवलेले अनेक जॉकी माथेरानमधील आहेत. २६ जानेवारी रोजी बंगळुरूच्या रेसकोर्सवर झालेली ग्रेड वन नामांकित डर्बी रेस त्याने पुन्हा एकदा जिंकून माथेरान च्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. २४०० मीटर अंतराच्या या शर्यतीमध्ये त्याने रॅक्युलिनो या घोड्यावर विजयी स्वारी केली. या घोड्याचे डर्र्स बैरामजी हे प्रशिक्षक आहेत. २४०० मीटर अंतराची ही शर्यत २ मिनिटे २९ सेकेंदांत पूर्ण करणाऱ्या जॉकी संदेशच्या विजयी स्वारीबद्दल माथेरानकरांनी आनंद व्यक्त केला आहे.

माथेरान शहरातील घोडेवाल्यांच्या कुटूंबात जन्म झालेल्या संदेशचे शालेय शिक्षण माथेरान मध्येच झाले. वडील तुकाराम आखाडे यांचे बोट धरूनच त्याने घोडे स्वारीचे धडे गिरविले. दहावीनंतर त्याने अश्वशर्यतीचे प्रशिक्षण घेऊन तो जॉकी झाला. शेकडो शर्यती संदेश याने जिंकल्या असून यंदाच्या बंगळुरू डर्बी वर त्याने आपले नाव कोरले आहे. माथेरानमधून देखील जॉकी संदेश आखाडे वर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# उरण महाविद्यालयात वार्षिक क्रीडा सप्ताह

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ, उरण वाणिज्य व कला महाविद्यालय, उरण येथे २१ ते २५ जानेवारी २०२५ रोजी वार्षिक क्रीडा सप्ताह प्र. प्राचार्य डॉ. एम. जी लोणे यांच्या मार्गदर्शनाखाली व रमेश ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता.

माजी प्राचार्य के.ए.शामा यांच्या हस्ते उद्घाटन झाले. या कार्यक्रमास कोटगाव विकास मंडळ अध्यक्ष हेमंत भोंबले प्रमुख अतिथी व पी. डी. पाटील सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते.

या क्रीडा सप्ताहात सांघिक खेळ मुले आणि मुली क्रिकेट, कबड्डी, खो-खो, फुटबॉल, वैयक्तिक खेळ, धावणे, लांब उडी, उंच उडी, भाला फेक, थाळी फेक आणि गोळा फेक इत्यादी व महाविद्यालयांमध्ये कॅरम, बुद्धिबळ खेळ घेण्यात आले. विजेत्यांचा गौरव करण्यात आला.




# उरणमध्ये जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धा उत्साहात

**उरण : बातमीदार**

प्रजासत्ताक दिन अर्थातच २६ जानेवारीचे औचित्य साधून सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कला, क्रिडा क्षेत्रात नेहमी अग्रेसर असणाऱ्या विजय विकास सामाजिक संस्थेतर्फे श्रीमान बाळासाहेब ठाकरे क्रिडा संकुल, उरण, स्विमिंग पूल, विमला तलाव शेजारी उरण शहर, जिल्हा रायगड येथे भव्य दिव्य असे रायगड जिल्हा स्तरीय जलतरण स्पर्धा २०२५ चे आयोजन करण्यात आले होते.



या स्पर्धेस मॉर्निंग वॉक ग्रुपचे जेएनपीटीचे पदाधिकारी सदस्यांनी विशेष मेहनत घेतली. सदर स्पर्धेचे उद्घाटन आमदार महेश बालदी, भाजपचे उरण तालुका अध्यक्ष रवीशेठ भोईर, शहराध्यक्ष कौशिक शहा, नगराध्यक्ष सायली म्हात्रे यांच्या हस्ते झाले. विजय विकास सामाजिक संस्थेचे अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर, ब्लू स्टार सेक्युरिटीचे डायरेक्टर विकास भोईर यांनी सर्वांचे स्वागत केले. या जिल्हा स्तरीय स्पर्धेत एकूण १५० हुन अधिक स्पर्धकांनी भाग घेतला. इंटर नॅशनल कोच किशोर केशव पाटिल, नॅशनल कोच हितेश जगन्नाथ भोईर, नॅशनल स्विमर संकेत केशव म्हात्रे, सचिन सिंगरूत,समर्थ नाईक,

अभिनंदन डालवी यांनी सदर स्पर्धेचे पंच म्हणून काम केले. या वेळी स्विमिंग पुलचे मॅनेजर श्रीकांत जाधव, मदन कटेकर, रुपम पाटील, दीपक घरत, विनायक पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी स्विमिंग (जलतरण) क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या मयंक दिनेश म्हात्रे, मोहित संदीप म्हात्रे, आर्य किशोर पाटील, संकेत केशव म्हात्रे, ओमकार सदानंद कोळी, राष्ट्रीय प्रशिक्षक (कोच)-हितेश भोईर, आंतरराष्ट्रीय कोच (प्रशिक्षक)- किशोर पाटील यांचा विशेष सत्कार करण्यात आला. विजय विकास सामाजिक संस्थेतर्फे आयोजित केलेल्या रायगड जिल्हा स्तरीय स्पर्धेला रसिक प्रेषक खेळाडूंचा उत्तम प्रतिसाद लाभला आहे. खेळाडूंना, स्पर्धकांना एक उत्तम व्यासपीठ मिळावे, खेळाडूंच्या कला गुणांना वाव मिळावा, व्यासपीठाच्या माध्यमातून खेळाडू हे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकावे, खेळाडूंना मान सन्मान मिळावा, खेळाडूंचे नाव लौकिक व्हावे या दृष्टीकोणातून दरवर्षी जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यंदाही अशा प्रकारचे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला खेळाडू, स्पर्धक, रसिक प्रेषकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला असल्याचे विजय विकास सामाजिक संस्थेचे अध्यक्ष विजय भोईर यांनी सांगितले.

**स्पर्धेतील विजयी उमेदवार**

सहा वर्षा खालील मुली : अन्वीका अविनाश निम्बलकर, आठ वर्षा खालील मुले: ड्रोन विशाल डोम्बे, आठ वर्षा खालील मुली : ओवी दिलीप म्हात्रे, दहा वर्षा खालील मुले : रुद्र नवले अनी,प्रिंस कठवले, दहा वर्षा खालील मुली : स्वरा महेश पाटिल, बारा वर्षा खालील मुले : अद्वैत संतोष हरुगड़े, बारा वर्षा खालील मुली : ओवी चिन्दलकर, चौदा वर्षा खालील मुले : मोहित संदीप म्हात्रे, चौदा वर्षा खालील मुली :- आभा वैभव मेहतर, सतरा वर्षा खालील मुले :- वेदांत विपुल पाटिल, सतरा वर्षा खालील मुली : रुद्राक्षी मनोहर टेमकर, खुला गट मुले : आर्यन वीरेश मोड़खरकर, खुला गट मुली : जान्हवी घरत.

# कुष्ठरोग जनजागृती मॅरेथॉन स्पर्धा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

सहाय्यक संचालक, संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग) रायगड व माणुसकी प्रतिष्ठान महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने, रायगड जिल्हा परिषदेसमोर कुष्ठरोग जनजागृती मॅरेथॉन स्पर्धा २०२५ उत्स्फुर्त स्पर्धक व नागरिकांच्या उपस्थितीत झाली.

कुष्ठरोग जनजागृती मॅरेथॉन स्पर्धेची सुरुवात सर्वप्रथम राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पुजन करून सर्व उपस्थितांच्या समवेत कुष्ठरोगाबाबतची प्रतिज्ञा घेवून झाली. या स्पर्धेत १३१ स्पर्धक सहभागी होते. ही स्पर्धा संपूर्ण अलिबाग शहरांत तीन किमी अंतरात घेण्यात आली.



या स्पर्धेत विजेते स्पर्धक मुले-प्रथम क्रमांक रामू गणत पारधी-(रक्कम ४००० रुपये), व्दितीय क्रमांक चिंतामण मारुती शिंगवा-(रक्कम २५०० रुपये), तृतीय क्रमांक स्वागत समिर पाटील (रक्कम १५०० रुपये), विजेते स्पर्धक मुली-प्रथम क्रमांक ऋतुजा जयवंत सकपाळ, (रक्कम ४००० रुपये), व्दितीय क्रमांक कथा अतुल वाडकर, (रक्कम २,५०० रुपये), तृतीय क्रमांत प्राजक्ता परशराम शिंदे (रक्कम १५०० रुपये)वरील विजेता स्पर्धकांचा प्रशस्ती पत्रके व ट्रॉफी देवून गुणगौरव करण्यात आला व बक्षीसाची रक्कम त्यांच्या बँकखात्यात जमा होणार आहे.

या स्पर्धेसाठी वैद्यकीय अधिकारी, डॉ. सचिन संकपाळ, वैद्यकीय अधिकारी, डॉ. अक्षयराज राठोड, ग्रामीण वैद्यकीय असोसिएशन, अध्यक्ष, डॉ. निशिगंध आठवले, वैद्यकीय असोसिएशन, सेक्रेटरी, डॉ. चांदोरकर, माणुसकी प्रतिष्ठान अध्यक्ष, डॉ. राजाराम हुलवान, लायन्स डायमन्ड अध्यक्ष, डॉ. रेखा म्हात्रे, जे.एस.एस. अध्यक्ष डॉ. नितिन गांधी, रिलायन्स क्लब अध्यक्ष, जल्हा वाहतूक उपनिरिक्षक प्रकाश काळोखे, के. डी पाटील, चेंढरे पोलीस पाटील, विकास पाटील आदी उपस्थित होते.

# राष्ट्रीय बेंचप्रेस स्पर्धेत सुरेश डुबल यांना रजतपदक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

छत्तीसगडमधील दुर्ग येथे झालेल्या राष्ट्रीय बेंचप्रेस चॅम्पियनशीप २०२५ या स्पर्धेमध्ये कळंबोली येथील पॉवरलिफ्टर सुरेश रामचंद्र डुबल यांनी रजतपदक पटकाविले आहे.



सुरेश डुबल यांनी ही कामगिरी ५० वर्षांवरील गट मास्टर २ या प्रकारात बॉडी वजन ७४ मध्ये १०० किलो वजन उचलले. डुबल यांनी पटकाविलेल्या पदकाबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. तसेच डुबल यांना यापूर्वीही अशा स्पर्धांमध्ये अनेक पदके मिळाली आहेत.

२०२३मध्ये छत्तीसगडमधील भिलई येथे झालेल्या राष्ट्रीय बेंचप्रेस व डेडलिफ्ट चॅम्पियनशीपमध्ये डुबल यांनी सुवर्णपदक पटकाविले होते.




# टेनिस बॉल क्रिकेटस्पर्धेत महसूल विभाग अलिबाग विजयी

**अलिबाग : प्रतिनिधी**

झुंझार युवक मंडळ पोयनाड तर्फे प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत महसूल विभाग अलिबाग संघाने आरोग्य कर्मचारी संघटना रायगड संघाचा अंतिम सामन्यात प्रभाव करत अंतिम विजयी होण्याचा मान मिळवला आहे. अलिबाग मुरूड तालुक्याचे उपविभागीय अधिकारी (प्रांत) मुकेश चव्हाण यांच्या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

स्पर्धेमध्ये पोयनाड व्यापारी असोसिएशनचा क्रिकेट संघ,रायगड जिल्हा आरोग्य कर्मचारी संघटना, अलिबाग तालुका महसूल विभागाचे दोन संघ व झुंझार वॉरियर्स अशा पाच संघाने सहभाग घेतला होता. प्रथम लीग व नंतर बाद फेरी नुसार स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेच्या अंतिम सामन्यात महसूल विभागाचा अष्टपैलू खेळाडू कल्पेश नाईक व भेदक गोलंदाज राकेश गोरेगावकर यांनी अप्रतिम खेळ करत संघाला विजय मिळवून दिला.



जिल्हा आरोग्य कर्मचारी संघटनेकडून निलेश कार्लेकर यांनी तुफान फलंदाजी करून प्रतिस्पर्धी संघासमोर कडवे आव्हान उभे केले होते. स्पर्धेचा मालिकावीर म्हणून कल्पेश नाईक याला वॉरियर्स कंपनीची बॅट व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले तर उत्कृष्ठ फलंदाज म्हणून जिल्हा आरोग्य कर्मचारी संघाचा खेळाडू निलेश कार्लेकर उत्कृष्ठ गोलंदाज म्हणून महसूल विभागाचे राजेश गोरेगावकर व झुंझार वॉरियर्स संघाचा सुरज चवरकर यांना चषक देऊन सन्मानित करण्यात आले.

बक्षीस वितरणासाठी अलिबागचे नायब तहसिलदार संदीप जाधव, पोयनाडचे मंडळआधिकारी महेश निकम, जिल्हा आरोग्य कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अमोल खैरनार, तलाठी अनिल म्हात्रे, किशोर जैन, भूषण चवरकर, किशोर तावडे, दिपक साळवी, नंदकिशोर चवरकर, अजय टेमकर, सुजित साळवी, पंकज चवरकर, ॲड. पंकज पंडित, अधिकारी, पोयनाड व्यापारी असोसिएशनचे सदस्य खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.



सौजन्य : नितीन पाटील, जिल्हा सरचिटणीस, उत्तर रायगड

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com